रायगड, शनिवार दि. १३ मे २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

Mumbai College Of Hotel Management
Admission Open for 2023-24
Degree/Diploma/Cookery/
Bakery/Certificate Course in
Hotel Management & Fashion Designing.
Phone No: 9623648916
Email ID: mumbaicollege@gmail.com

वेधक

परमबीर सिंह यांचे निलंबन रद्द



मुंबई : मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्यावरील भ्रष्टाचाराचे सर्व आरोप मागे घेत निलंबन रद्द करीत शिंदे-फडणवीस सरकारने त्यांना दिलासा दिला आहे. विविध भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने डिसेंबर २०२१ मध्ये परमबीर सिंह यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती. राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपयांच्या वसुलीचा आरोप करीत परमबीर सिंह यांनी तत्कालीन राज्य सरकारला दिलेल्या लेटरबॉम्बमुळे राज्यात खळबळ उडाली होती.

सीबीएससी दहावीचा निकाल जाहीर

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएससी) दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेसाठी एकूण २१,०९,२०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २०,९३,९७८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. एकूण उपस्थितांपैकी १९,७६,६६८ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. एकूण ६४,९०८ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के आणि त्याहून अधिक गुण मिळवले, तर २,३६,९९३ विद्यार्थ्यांनी ९० टक्के आणि त्याहून अधिक गुण मिळवले आहेत.

संघर्ष पेटला

नैनाग्रस्तांचा भूखंड वाटपास विरोध
आंदोलकांविरोधात पोलीस बळाचा वापर

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील २३ गावांमध्ये नैना प्रकल्प येऊ घातलेला असून, याविरोधात येथील शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला आहे. कोणत्याही प्रकारे भूखंड हस्तांतरण होऊ देणार नाही, असा निर्धार शेतकऱ्यांनी केला असून, याविरोधात आंदोलन सुरू आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता शुक्रवार (दि. १२) रोजी देवद येथे नैनातर्फे भूखंड हस्तांतरण कार्यक्रम सुरू ठेवण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी प्रखर विरोध दर्शवत तो बंद पाडण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी बळाचा वापर करीत माजी आ. बाळाराम पाटील यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांना ताब्यात घेतले. काही वेळानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

देवद येथील सर्वे नंबर ७८/० या जागेचा नैनातर्फे भूखंड हस्तांतरण करण्यात येत होते. याला येथील शेतकरी बांधवांनी प्रखर विरोध केला. वेळ पडली तर रक्त सांडवू, मात्र जमीन फुकटात देणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. माजी आमदार बाळाराम पाटील यांनीदेखील शेतकऱ्यांची भूमिका स्पष्ट केली आणि या भूखंड हस्तांतरण कार्यक्रमाला जाहीर विरोध दर्शवला. हा प्रकल्प होऊ देणार नाही, आपण अटक करून घेऊया अशी रोखठोख भूमिका जी.आर. पाटील यांनी मांडली.

> वेळ आली तर रक्त सांडवू आणि स्थानिकांचा विचार न करता इतरांचा विचार केला तर वेगळ्या पद्धतीने आम्हाला विचार करावा लागेल. स्थानिकांचा विचार करूनच पुढचा निर्णय घ्या, अन्यथा पुढचे आंदोलन उग्र असेल.
> - माजी आ. बाळाराम पाटील

यावेळी शेतकऱ्यांनी सर्व्हे बंद करण्याचा प्रयत्न केला. पुढच्या काळात प्रकल्पग्रस्तांची ताकद वाढवून आंदोलन करावे लागणार आहे. शेतकऱ्यांना जर जमीन द्यायची नसेल, तर हिटलरशाहीने जमीन ताब्यात घेणार का, असा सवाल नरेंद्र भोपी यांनी विचारल्यानंतर सिडको (नैना) अधिकारी निरुत्तर झाले.

नैना ही उद्योगपतीला विकले गेले आहे का आणि कायद्याचे रक्षक हे भक्षक झाले आहेत का, असा सवाल पाटील यांनी केला. •> पान २ वर

पैसा नको, रेशन द्या

जिल्ह्यातील आदिवासींची मागणी

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

आदिवासी भागातील लाभार्थ्यांना डीबीटीद्वारे पैसे देण्याऐवजी त्यांना धान्य स्वरुपात मदत करावी. आम्हाला पैसे नको, रेशन पाहिजे, अशी मागणी करीत रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी राज्य शासनाच्या डीबीटी प्रक्रियेला विरोध केला. राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ही योजना सुरू आहे. मात्र, रायगडात ही प्रक्रिया सुरू होणार असेल, तर त्यास आमचा विरोध असेल, अशी रोखठोक भूमिका यावेळी आदिवासी बांधवांनी मांडली.

राज्य शासनाने २८ फेब्रुवारी २०२३ रोजी परिपत्रक घोषित करून धान्याऐवजी रोख पैसे देण्याची घोषणा करुन ही महाराष्ट्रमधील १४ जिल्ह्यांमध्ये डीबीटी सुरूसुद्धा केले आहे. मात्र, या डीबीटीला रायगड जिल्ह्यामध्ये कुठेही पायलट डीबीटी सुरू होणार असेल तर त्यास आदिवासी बांधवांचा पूर्णपणे विरोध असेल, आम्हाला राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याप्रमाणे धान्य पाहिजे, पैसे नको, अशी मागणी करत जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा, तळा, रोहा तालुक्यातील आदिवासी बांधवांनी वाड्यांवरील ठराव व निवेदन आदिवासींसाठी कार्य करणाऱ्या रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी •> पान २ वर

चौल येथे महिलेचा विनयभंग

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

चौल चुनेकोळीवाडा येथे शेतावरुन घरी परत जात असताना महिलेचा रस्ता अडवून तिला शिवीगाळ, मारहाण करून विनयभंग केल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे करण्यात आली असून, दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोघांवर गुन्हा दाखल

चौल दादर येथील पीडित महिला दि. १० मे रोजी दुपारी बाराच्या सुमारास चौल चुनेकोळीवाडा येथून शेतातून काम करून घरी परतत असताना दोघा आरोपींनी त्यांचा रस्ता अडवून अश्लील शिवीगाळ करून त्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला. तिचा उजवा हात खेचून, केस धरून खाली पाडले व हाताबुक्क्याने मारहाण करुन तिच्या मनात लज्जा निर्माण होईल असे वर्तन केले, अशी तक्रार पीडित महिलेने केली आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहा. फौजदार प्रमोद देसाई पुढील तपास करीत आहेत.

थेरोंडा येथे बोट जळाली

रेवदंडा : थेरोंडा खंडेरावपाडा समुद्रकिनारी उभ्या असलेल्या बोटीस अकस्मात आग लागली. या आगीत बोटीचे अंदाजे एक लाखाचे नुकसान झाल्याचे रेवदंडा पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याबाबत सविस्तर वृत असे की, दयानंद जंगली (४६) यांच्या 'नारायण' फायबर बोटीस अकस्मात आग लागून बोटीचे इंजिन व जाळ्यांचे अंदाजे एक लाख रूपयांचे नुकसान झाले आहे. याबाबत अधिक तपास रेवदंडा पोलीस करीत आहेत.

तीन महिन्यांत ५८ मुले बेपत्ता

तब्बल ४७ बालिका, ११ बालकांचा समावेश

अलिबाग । भारत रांजणकर ।

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील २८ विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून गेल्या तीन महिन्यांत तब्बल ४७ बालिका, तर ११ बालक गायब झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. मुले गायब होण्याच्या प्रकाराने पालक चिंतातूर झाले आहेत. यासंदर्भात ५३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

देशभरात महिला आणि मुली गायब होण्याचे प्रकार वाढत असून, महाराष्ट्रात तीन महिन्यांत पाच हजारांहून अधिक मुली हरवल्याचे समोर आले. यात रायगड जिल्हादेखील मागे नाही. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात पनवेल आणि उरण तालुका वगळता १३ तालुक्यांचा समावेश आहे. या १३ तालुक्यांमध्ये २८ पोलीस ठाणे आहेत.

अलिबाग, कर्जत आणि नेरळ या तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून सर्वाधिक जास्त प्रत्येकी पाच मुलींचे अपहरण झाल्याचे गुन्हे दाखल आहेत. तर, रोहा, रसायनीमधून चार मुली बेपत्ता झाल्याची नोंद झाली आहे. खालापूर, पेण आणि पाली पोलीस ठाण्यात प्रत्येकी तीन मुली गायब झाल्याच्या तक्रारी दाखल आहेत. माणगाव, गोरेगाव, नागोठण्यातून प्रत्येकी दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याचे गुन्हे दाखल आहेत. महाड तालुका, महाड शहर, माथेरान, खोपोली, वडखळ, पोयनाड आणि रेवदंडा या पोलीस ठाण्यातून प्रत्येकी एक मुलगी बेपत्ता आहे.

दिलासादायक म्हणजे, पोलादपूर, महाड एमआयडीसी, श्रीवर्धन, दिघी सागरी, म्हसळा, कोलाड, मुरुड, तळा, दादर सागरी आणि मांडवा सागरी या दहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून एकाही मुलीच्या अपहरणाबाबतचा गुन्हा दाखल झालेला नाही.

याच तीन महिन्यांत ११ बालक गायब झाल्याचे •> पान २ वर

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

आज़ादी का अमृत महोत्सव | सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | G20 भारत 2023 INDIA

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

राज्यव्यापी अभियानाचा शुभारंभ

शनिवार, दि. १३ मे २०२३
सकाळी १० वा. दौलतनगर (मरळी),
ता. पाटण, जि. सातारा

अंमलबजावणी वेगवान

योजना कल्याणकारी सर्वसामान्यांच्या दारी !

अभियानाची वैशिष्ट्ये

- प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५००० लाभार्थ्यांना एकाच छताखाली लाभ देण्यात येणार
- शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ, कमीतकमी कागदपत्रे आणि जलद मंजुरी
- पहिल्यांदाच सर्व प्रशासन 'हर घर दस्तक' च्या माध्यमातून प्रत्येकाला योजनांची माहिती देणार

एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री | देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

पान १ वरुन

संघर्ष पेटला

यावेळी अनेकांनी आमची जमीन फुकट न घेता जमीन अधिग्रहण करा असे ठणकावून सांगितले. यावेळी महिलांनी आमची जमीन फुकट घेणाऱ्या नैना अधिकाऱ्यांना तळतळाट लागेल अशा शिव्या शाप दिल्या. तर सुकापूर येथे ३० माळ्याची ईमारतीचे काम सुरू आहे. त्याला विमान अडकणार नाही आणि शेतकऱ्यांनी बांधलेल्या चार माळ्याच्या इमारतीला कोणते विमान अडकणार आहे असा सवाल राजेश केणी यांनी उपस्थित केला. यावेळी नैनासोबत नियोजन बैठक लावण्याची मागणी करण्यात आली. तर ७८/० सर्व्हे नंबर असलेला प्लॉट २३ कोटी रुपयांना विकला गेला असल्याचे सांगण्यात आले.

आम्हला आमची शेती द्यायची नाही, हे कॉंक्रीट जंगल कशासाठी उभारणार आहेत. टाऊन प्लॅनिंग ऑफिसरला जोड्याने मारायला हवे असे एड. सुरेश ठाकूर यांनी भाषणात सांगितले. सिडकोच्या माध्यमातून बैठक लावण्यात येणार असल्याचे दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सांगितले. दरम्यान, पोलिसांनी माजी आमदार बाळाराम पाटील, जी.आर. पाटील, राजेश केणी, सुभाष भोपी, नामदेव फडके, शेखर शेळके, अनिल ढवळे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांना अटक केली. काही काळानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

पैसा नको, रेशन द्या

संघटना, सर्व विकास दीप माणगाव, स्नेहवर्धिनी सोशल ट्रस्ट वरसे रोहा या संघटनांच्या माध्यमातून जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांना दिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमन २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या केसरी शेतकरी कार्डधारकांना २८ फेब्रुवारी परिपत्रक घोषित करून धान्य ऐवजी रोख रक्कम देण्याची घोषणा केली. २०२३ च्या राज्य शासनाच्या बजेटमध्ये योजनेचा पुरस्कार केला. योजना त्वरित राबविण्यात आर्थिक तरतूद केली. प्रतिमहा प्रतिलाभार्थी १५० इतक्या रोख रकमेचे थेट हस्तांतरण योजना कार्यान्वित करण्याचे जाहीर केले.

असे असतानासुद्धा शासनाने डीबीटी या गोंडस नावाखाली धान्य बंद करून प्रति मानसी १५० रुपये देण्याची तरतूद केलेली त्याची अंमलबजावणीसुद्धा १४ जिल्ह्यांमध्ये केलेली दिसते. डीबीटीची योजना रायगड जिल्ह्यामध्ये येऊ नये, कारण जिल्ह्यात बहुतांश आदिवासी समाज असून, डिबीटीचे वाईट परिणाम पाहायला मिळतील अन्यथा उपासमारी, कुपोषण सारखे प्रकार घडतील. रायगडमध्ये डीबीटी लागूच करू नये म्हणून आदिवासींसाठी कार्य करणाऱ्या संघटना रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी संघटना रायगड, सर्व विकास दीप माणगाव, स्नेहवर्धिनी सोशल ट्रस्ट वरसे-रोहा संघटनेच्या माध्यमातून माणगाव, म्हसळा, तळा, रोहा, तालुक्यातील आदिवासी वाड्यातील ठराव जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांना देण्यात आले यावेळी रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भिवा पवार, माणगावचे रीची भाऊ, महेश मोरे, विनायक धुरी, एस पी ताई, स्नेहवर्धिनी संस्था रोहाच्या सुप्रियाताई झोलगे, करमिलताई, मेरी ताई, नरेश जाधव, विष्णू वाघरे, मंगेश जाधव,एकनाथ जाधव यांच्या सह असंख्य आदिवासी बांधव उपस्थित होते

तीन महिन्यांत ५८ मुले बेपत्ता

गुन्हेदेखील नोंद आहेत. यात कर्जतमध्ये तीन, रसायनीतून दोन तर रोहा, कोलाड, नेरळ, खोपोली, पेण आणि रेवंदडा या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून प्रत्येकी एक बालक गायब झाल्याची नोंद आहे. एकूण ५८ अल्पवयीन मुले-मुली गायब असल्याने त्यांच्या शोध लावण्याचे मोठे आव्हान रायगड पोलीस दलावर आहे.

अलिबाग नगरपरिषद

फेर जाहिर निविदा सूचना

मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग-रायगड खाली नमूद केलेल्या कामांसाठी पुरवठादाराकडून खाली नमूद केलेल्या साहित्यांचे प्रति नगाचे दर व बसवून देणेकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नांव	इसारा रक्कम धनाकर्षाद्वारे	निविदा फॉर्म फी	निविदा फॉर्म मिळण्याचा व निविदा सादर करण्याचा दिनांक
३	घंटागाडी (टाटा) चे पुढील व मागील टायर ट्यूब पुरविणे.	२००/-	१००/-	१३.०५.२०२३ ते २२.०५.२०२३ सकाळी. ११.०० ते सायंकाळी ४.३० पर्यंत
४	फिरते शौचालय चे एक चाकाचे पूर्ण सेट पुरविणेबाबत.	१०००/-	५०/-	

सूचनाः- १) कामाबाबत अधिक माहिती निविदा फॉर्म मध्ये देण्यात आलेली असून नगरपरिषद कार्यालयात आरोग्य विभागात उपलब्ध होईल.
२) देकार द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याचे असून लिफाफा नं.१ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं.२ मध्ये वित्तीय बोलिचा फॉर्म सादर करण्याचा आहे.
३) राष्ट्रीयकृत बँकांकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गाण तर्फे परहुर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक मे. एन के ॲग्रो फार्म तर्फे प्रोप्रायटर केतन शाह यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	स.नं./हि.नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
१) गाणतर्फे परहूर	४/१	०-३२-५० पो.ख. ०-०२-५० ०-३४-७०	२.५९
२) गाणतर्फे परहूर	६/५/ब/११	०-२०-००	०.३५

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही त-हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १३/५/२०२३

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सालपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक तानाजी रामजी पाटील यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.	आकार रू.पै.
२	७	०-२२-२०	१-६४
२	८	०-०३-००	०-०६

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १३/०५/२०२३

ॲड.योगेश डी.ठाकरे
बी.ए.एल.एल.बी
पत्ता क्रमांक १-पुलाचीवाडी, पोस्ट
किरवली, ता.कर्जत जि.रायगड- ४१०२०१.
पत्ता क्रमांक २-दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड-४१०२०१
मोबाईल नंबर ९८९०७३८३५६.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिल श्री.सुनिल किशोर शहा व सौ.नुतन सुनिल शहा मु.पो.अलिबाग ता.अलिबाग यांची निवासी गाळा मिळकत मौजे अलिबाग, ता.अलिबाग येथे आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मिळकतीचे वर्णन

मौजे अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड येथील सिटी सर्वे नं.७४१अ+७४१ब या मिळकतीवरील नातु रिजन्सी या सोसायटी मधील निवासी गाळा क्र.१०५, क्षेत्र ८०० चौ.फुट कारपेट+१०० चौ.फुट टेरेस, पहिला मजला.

वर वर्णन केलेल्या निवासी गाळा मिळकतीचा करारनामा दुय्यम निबंधक अलिबाग यांजकडे दि.०५.०६.२०१० रोजी रजिस्टर्ड दस्त क्र.अलब-२२८५/२०१० ने प्रियंवदा श्रीपाद भिडे व मे.एस.सी.सी.इंजिनिअर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर उदय विष्णु साठे यांचेमध्ये रजिस्टर्ड झालेला आहे. सदरचा मूळ करारनामा प्रियंवदा श्रीपाद भिडे यांचेकडून पेण बाजारपेठ दरम्यान दि.२२.०४.२०२३ रोजी १२ वाजताचे सुमारास प्रवास करत असताना कोठेतरी पडून गहाळ झाला आहे. याबाबत त्यांनी ०३.०५.२०२३ रोजी पोलिस स्टेशन पेण येथे करारनामा गहाळ झाल्याबाबत नोंद केलेली आहे. सदरची नोंद पेण पोलिस ठाण्यामध्ये प्रॉपर्टी मिसींग रजिस्टर्ड नं.३२२/२०२३ अन्वये दाखल असून तसा दाखला त्यांना दिला आहे.

वर वर्णनाची निवासी गाळा आमचे अशिल श्री.सुनिल किशोर शहा व सौ.नुतन सुनिश शहा यांनी दि.०३.०४.२०२३ रोजी दस्त क्र.१२५२/२०२३ ने रजिस्टर्ड करून विकत घेतला असून ते सारस्वत को.ऑ.बँक लि.शाखा अलिबाग यांजकडे तारण ठेवून कर्ज घेत असून सदरहू निवासी गाळ्याचे टायटल सर्टिफिकेट आमचे अशिलांस देण्याचे आहे. तरी याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१३.०५.२०२३

मिलिंद चव्हाण
ॲडव्होकेट
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. नियाज अ.सिद्दिकी आणि माथुम मु. अल यांनी मौजे खारकोलेटी ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत विद्यमान जमीन मालक श्री. आदिनाथ महादेव पाटील यांचे कडून कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सर्वे न.	हिस्सा न.	क्षेत्र हे.आर. पो.	आकार रु.पैसे
६९	१/१	०-३३-८०	४-१०

पैकी क्षेत्र ०-१७-० (सतरा गुंठे) खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे मालकीची ताबेकबजाची, वहिवाटीची आहे. तरी वरील मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षीस, बोजा, पोटगी, चार्ज संपादन, भाडेपट्टा, खरेदीखत या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधितानी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ (आठ) दिवसाचे मुदतीत खाली सही करणार ॲडव्होकेट विद्याधर चंद्रकांत ठाकूर यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल वरिल मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण,
ता. १३-०५-२०२३
मोबाइल ९४२२६९३०२४

सही
ॲड. विद्याधर चंद्रकांत ठाकूर
मुक्ताईनगर पेण, प्राजक्ता पॅलेस पेण,
एम.एस.इ.बी चे पश्चिमेला, मुंबई
गोवा हायवेच्या पूर्वेला, प्रांत
ऑफिसचे दक्षिणेला ता.पेण
जि.रायगड ४०२१०७

Required Teaching Staff

PNP Education Society is one of the leading education society working since 2001. For our various English medium schools (affiliated to CBSE and State Board) located at Nagaon, Sambari(Kurdus), Veshvi, Vavoshi and Khalapur we require Principals and teachers.

Qualification - As per the norms.

Pay scale - For the post of the Principals Rs. 50,000/- to 1,00,000/-

For the post of the teachers Rs. 15,000/- to 40,000/-

Note : Pay scale depends on the qualification, experience, teaching skills and previous CTC.

For more details please contact

Amit Deshpande : 9673766347, Shruti Sutar : 9673371587

Rajashree Patil : 9892150116

Please mail your CV on

pnp.ajd@gmail.com / shrutisutar154@gmail.com

pnp.rajashree@gmail.com / pnpedusoc@gmail.com

Note : Fluency in English is a must

जाहीर नोटीस

अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात

श्रीमती सुशिला अर्जुन म्हात्रे वगैरे — अपिलार्थी
विरूध्द
श्री.मच्छिंद्र रामजी म्हात्रे वगैरे — उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात टेनन्सी अपिल क्र.१६१/२०२२ दाखल केले आहे.

गावाचे नाव	स.नं./ गट नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
मौजे ताडाचा कोठा ता.अलिबाग	१	१क	०-८८-०	११.४४

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थींचे नाव :
५ श्री.वासुदेव विष्णु कुळकर्णी — उत्तरार्थी
६ श्री.जगन्नाथ विष्णु कुळकर्णी
क्र.५ व ६ रा.मु.चरी, पो.पोयनाड,
ता.अलिबाग जि.रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.१५/०५/२०२३ रोजी सकाळी/दुपारी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(प्रशांत ढगे)
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल श्री. राजन रामनाथ डेरे, वगैरे यांच्या वडिलोपार्जित मालकी व खुद्द ताबेकब्जावहिवाटीत आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
झिराड ता. अलिबाग	५२३ जुना सर्व्हे नं. २०९/१	१.०३.०० पोटखराबा ०.२४.०० एकूणक्षेत्र १.२७.००	२.१५

सदर मिळकतीबाबत श्रीकृष्ण रामकृष्ण साळवी, वगैरे यांनी तहसीलदार अलिबाग यांचेकडे संकिर्ण अर्ज क्र. ८/२०१८ दाखल केला होता. त्या अर्जाचे कामी तहसीलदार यांनी दिलेल्या निकालाचे विरुद्ध आमचे अशिलांनी मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कोर्टात आर.टी.एस. अपिल क्र. ४३/२०२१ हे दाखल केले होते. सदर अपिलातील निकालाचे विरुद्ध आमचे अशिलांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडे आर टी एस अपिल क्र. १५/२०२३ हे दाखल केले असून ते प्रलंबित आहे. सदर मे. तहसीलदार अलिबाग व मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे निकालाचा गैरफायदा घेऊन कै. श्रीकृष्ण रामकृष्ण साळवी मयत तर्फे वारस संदिप श्रीकृष्ण साळवी वगैरे हे सदरची मिळकत विकणेचे तयारीत असल्याचे खात्रीलायक माहिती आमचे अशिलांस मिळालेली आहे. त्यामुळे आमचे अशिलांनी मे. तिसरे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रेग्युलर मुकदमा नं. ६१/२०२३ हा दाखल केलेला असून सदरचा दावा हा प्रलंबित आहे. सदर दाव्यासंदर्भात आमचे अशिलांनी मा.सहा. दुय्यम निबंधक वर्ग २ यांचे कार्यालयात नोटीस ऑफ लिस पेंडस ही दि. १२/५/२०२३ रोजी दस्त क्र. अलज १८८०/२०२३ ने केलेली आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणीही कसलाही खरेदी, विक्री, दान, बक्षिस, साठेकरार तसेच अन्य कोणताही व्यवहार कोणीही श्रीकृष्ण रामकृष्ण साळवी, वगैरे यांच्याशी करु नये, असा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास तो बेकायदेशीर असेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व संबंधित व्यक्ती प्रामाणिक खरेदीदार होणार नाही व संबंधित व्यक्तींविरुद्ध आमचे अशिल कायदेशीर कारवाई करतील याची संबंधितांनी या जाहीर नोटीशीने नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १२/५/२०२३

सही/-
ॲड. महेश मधुकर ठाकूर

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, आमच्या पक्षकारांनी मौजे झिराड, पोस्ट झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमीन गट क्रमांक २१७, एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ०७.९० आर. आकार २५० रुपये ०० पैसे पैकी ०० हेक्टर ६०.९० आर. आकार ३४ रुपये ०५ पैसे व त्यावरील बांधलेली रहिवासी विला क्षेत्र ७४४.०० चौ.मी. ज्याची चर्तुःसीमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस : गट क्रमांक २१७ मधील शिल्लक जमीन व त्यामधून ९०० मीटर रुंद अप्रोच रोड.
पश्चिमेस : गट क्रमांक २३९, २३८ मधील जमीन
दक्षिणेस : गट क्रमांक २१७ मधील शिल्लक मधील जमीन व त्यामधील रस्ता.
उत्तरेस : गट क्रमांक २४१ मधील जमीन.

येणेप्रमाणे चर्तुःसिमेच्या आतील मिळकत श्री. आदित्य हर्षवदन मंगलदास रा. १२, ओशियन व्हिव्ह अॅनेक्स, १०० भुलाभाई देसाई रोड, मुंबई व मे.दि. व्हिक्टोरिया मिल्स लि. यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचा करार केला आहे.

सदरील मिळकतीबाबत कुणाचेही कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असतील किंवा सदरील व्यवहारास कुणालाही कोणत्याही कारणाने काहीही आक्षेप असेल तर त्यांनी त्यांचे हितसंबंध किंवा आक्षेप आम्हास खालील पत्त्यावर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसांच्या आत संबंधित कागदपत्राच्या नकलांसहीत कळवावा. मुदतीच्या आत कोणाचाही आक्षेप न आल्यास सदरील मिळकत ही पूर्णपणे दोषमुक्त आहे असे समजून आमचे पक्षकार वर उल्लेखित व्यक्तीकडून सदरील मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील. तदनंतर कोणाचाही आक्षेप आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १२.०५.२०२३

सही/-
ॲड. अनिल पांडुरंगजी मालानी
फ्लॅट नंबर ४-ए, दिशा चिंतामणी अपार्टमेंट
विवेकानंद परम, महावीर नगर,
पीर बाजार उस्मानपुरा, औरंगाबाद
मो. ९८२३९११४६०

जाहीर नोटीस

श्री.भरतकुमार हिरालाल शहा तालुका पेण, जिल्हा व तुकडी रायगड, तालुका व तुकडी पेण, अलिबाग हद्दीतील खरेदीखत दिनांक २०/०६/१९४४ रोजी हेमचंद भाईदास शेठ गुजर यांच्या नावे खरेदीखत झाले होते त्यांचा नोंदणी दस्त क्रमांक ७९३/१९४४ असा आहे. तसेच त्यानुसार दिनांक १४/१०/१९४४ रोजी त्यानुसार त्यांच्या मिळकतीचे वाटणीपत्र दस्त क्रमांक ७८०/१९४४ प्रमाणे झाले होते. सदर खरेदीखत व वाटपपत्राची मुळ प्रत ही माझे वडील कै.हिरालाल हेमचंद्र शहा यांचे निधनानंतर असे मुळे दस्ताऐवज माझ्या ताब्यात होते.

दिनांक ०३/०५/२०२३ रोजी मी दादर-रत्नागिरी या ट्रेनने पनवेल येथून पेण येथे रेल्वेने प्रवास करून येत असताना सायंकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास पेण रेल्वे स्टेशनवर उतरत असताना त्यावेळी गर्दी होती. गर्दीत उतरत असताना माझ्या ताबेकब्जात हातात असलेले वर नमुद केलेले दोन्ही मुळ दस्ताऐवज हे गर्दीत गहाळ झाले. त्यावेळी मी ते दस्त शोधले असता ते सापडून आले नाही. त्याबाबत पेण पोलीस स्टेशन येथे दिनांक ०४/०५/२०२३ रोजी घोषणापत्र व अर्ज व इतर कागदपत्रे देऊन तक्रार दिली. त्याबाबत प्रॉपर्टी मिसींग नंबर ३२९/२०२३ असा दाखल झाला असून तसा दाखला दि.०५/०५/२०२३ रोजी ठाणे अंमलदार पेण पोलीस स्टेशन यांनी दिला आहे. सदर गहाळ झालेल्या दस्तावर आमचे व आमचे कुटूंबिया व्यतिरिक्त कोणीही व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी आमची राहणार नाही. मुळ खरेदीखत व वाटणीपत्राचा दस्त कोणालाही सापडल्यास तो खालील पत्त्यावर आणून द्यावा.

पेण
दिनांक : ०७/०५/२०२३

आपला विश्वासू
सही/-
श्री.भरतकुमार हिरालाल शहा
पत्ता : रा.साईकृपा मोरेश्वर बिग सिनेमा
ता.पेण, जि.रायगड
मो.नं.८७९६२९३४००

जाहिर नोटीस

रायगड विभाग रायगड
जा.क्र/वनी सं /२४९/२०२३
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग याचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि.रायगड

संस्था नोंदणी अर्ज क्रमांक :- RGD/6144/1860/2023 दि.१२/५/२०२३
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- 'कराडी समाज ग्रामस्थ मंडळ-२ रेवदंडा मु.रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड ....बाबत
श्री.दत्ताराम नारायण शेळके ....अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक संस्था निबंधक रायगड विभाग रायगड हे नमूद केलेल्या संस्था नोंदणी अर्ज क्रमांक ....यासंबंधी संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये खालील मुद्दयांवर चौकशी करणार आहेत.

(२३) वर नमुद केलेली संस्था अस्तित्वात आहे काय? आणि सदरची संस्था सार्वजनिक स्वरूपाची आहे काय?
(२४) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर संस्थेच्या मालकीची आहे काय?
(ए) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम-१३२०/-रूपये (एक हजार तीनशे वीस मात्र)
(ब)स्थावर मिळकत :- (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहायक संस्था निबंधक, रायगड विभाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२/०५/२०२३ रोजी दिली.

सही/-
(श्रीम .अंजली रमेश पिसाळ)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड.

खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड, पीनकोड नं. ४१० २०३.
फोन नं.(०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

KMC

जा.क्र.केएमसी/बांधकाम/५५४ — दिनांक : १२/०५/२०२३

बांधकाम विभाग
निविदा सुचना क्र.१४

खोपोली नगरपरिषद, खोपोली जि.रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून- १ नमुन्यातील द्विनोंद लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागविणेंत येत आहेत.

अ. क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रू.	अनामत रक्कम रू.	काम करण्याचा कालावधी	निविदा फॉर्म विक्रीची किंमत
१	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.७ मध्ये शिळफाटा येथे आयेशा कॉम्प्लेक्स समोरील जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे.	४४२०७७	५००१	३० दिवस	५००
२	प्र.क्र.४ मध्ये विरेश्वर मंदिराजवळील रस्ता दुरूस्ती करणे.	४९४९६७	५००२	३० दिवस	५००
३	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.१२ मधील विणानगर येथील रचना किराणा दुकानासमोरील गटाराचे यु.सी.आर चे बांधकाम करणे.	९९६३३	५००३	३० दिवस	५००
४	प्र.क्र.१४ मधील मानव दृष्टी बिल्डींग सोसायटी समोर फुटपाथ तयार करणे.	१५९४८२	५००४	३० दिवस	५००
५	प्र.क्र.१२ मध्ये श्रुती हौसिंग को.सोसायटी समोर फुटपाथ तयार करणे.	४०३४८	५००५	३० दिवस	५००
६	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.१२मध्ये विणानगर येथील मुस्कान हाईट्स समोरील आरसीसी गटार बांधणे	४९३८४३	५००६	३० दिवस	५००
७	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.७ मध्ये शिळफाटा मोहल्ला येथील सार्वजनिक शौचालय येथे गटार तयार करणे व संगम हॉटेलच्या मागे विविध ठिकाणी स्लॅब टाकणे.	७०५६२४	५००७	३० दिवस	५००
८	प्र.क्र.१४ मध्ये वर्धमान नगर येथील क्रॉस ड्रेन तयार करणे.	२५००५८	५००८	३० दिवस	५००
९	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.१४ मध्ये काजुवाडी येथील रविंद्रनाथ टागोर जलशुध्दीकरण केंद्रजवळील न.प.कामगार चाळीमधील बुद्धभुषण वाघमारे रहात असलेली रूम दुरूस्त करणे.	१०५००३	५००९	३० दिवस	५००
१०	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.१३ मध्ये अशियाना पॅराडाईज बिल्डींग नं.४ समोर स्लॅब टाकणे.	५६२३५	५०१०	३० दिवस	५००
११	प्र.क्र.१३ चंदन पार्क इमारती समोरील रस्त्यामध्ये आरसीसी पाईप टाकणे व एचपी लाईन क्रॉसींगकरीता पेविंग ब्लॉक बसविणे	३११९७५	५०११	३० दिवस	५००
१२	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.१४ मध्ये भानवज गांव कॉर्नर येथील मुकूंदराज अपार्टमेंट समोरील गटारावर स्लॅब टाकणे व जाळी बसविणे	१५२९०२	५०१२	३० दिवस	५००
१३	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.०७ मध्ये आरव्हीव्ही इंटर नॅशनल शाळेसमोर व विविध ठिकाणी गटारावर स्लॅब टाकणे.	९२८५०	५०१३	३० दिवस	५००
१४	खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.७ मध्ये श्रीराम नगर येथे गार्डन विकसित करणे.	४९२४६२	५०१४	३० दिवस	५००

कामाच्या अटी व शर्तीः-
१.निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दि.१५/०५/२०२३ ते २२/०५/२०२३ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं.५.३० वा पर्यंत राहील. मात्र या करीता निविदा फॉर्म फी नागरी सुविधा केंद्रात जमा केल्यानंतर बांधकाम विभागातून फॉर्म उपलब्ध करून मिळेल.
सविस्तर कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

सही/-
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद

निवडक

तरूण बेपत्ता

रसायनी : सावळे गावातील १९ वर्षीय तरूण हरवल्याची घटना घडली असून रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हर्षल कैलास माळी रंगाने गहूवर्णिय, केस काळे, नाक सरळ, चेहरा गोल, डोळे काळे, असे हरवलेल्या तरूणाचे वर्णन असून कामाला जातो असे सांगून घरातून कुठेतरी निघून गेला आहे. याबाबत आजूबाजूस व नातेवाईकाकडे शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्याबद्दल कैलास माळी यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोनि अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना के. के. पाटील अधिक तपास करीत आहेत.

रुग्णांना फळेवाटप

उरण : उरण तालूक्यात वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा व अनेक सामाजिक संस्थांच्या वतीने सरकारी दवाखान्यात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले व अतिशय उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला. राज्यात यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यावेळी राजाराम पाटील, अमोल शेजवळ, डॉ. कालेल, वंचित कार्यकर्ते ओव्हाळ, रघुनाथ बागुल, सुनील गायकवाड, प्रभाकर जाधव, वंचित संघटक लखन, विश्वतेज कांबळे, लोंढे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

साईभंडाऱ्याला प्रतिसाद

रसायनी : मोहोपाडा रसायनीतील श्री साईबाबा मंदिरात दर गुरुवारी अन्नदान सुरू झाला असल्याने परिसरातील साईभक्तांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. हा साई भंडारा साईबाबा कमिटीच्यावतीने दर गुरुवारी दुपारी १२ वाजता श्री साई आरती झाल्यानंतर साईभक्तांना दिला जात आहे. यावेळी अनेक साईभक्त प्रसाद सेवेचा लाभ घेत आहेत. ज्या साईभक्तांना अन्नदान करायचे असेल त्यांनी अध्यक्ष ९९६०९४०२४४, उपाध्यक्ष -९८५०७५७१२१ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मंदिराचे लोकार्पण

पनवेल : उरण शहरातील गणपती मंदिर बाजार पेठ जवळ असलेले श्रीराम पुरातन मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले असून देवी-देवतांच्या प्राण प्रतिष्ठेचा उत्सव बुधवार दि.१० ते शुक्रवार दि. १२ मे पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्रीराम मंदिर ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर यांनी दिली. यानिमित्ताने उरण गणपती चौक येथील श्रीराम मंदिरपासून रथ यात्रा काढण्यात आली. या रथ यात्रेत अनेक लहान, ज्येष्ठ महिला, पुरुष सहभागी झाले होते.

कचरा सर्वक्षण सुरु

खांब-रोहा : रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी या ग्रा.पंचायत हद्दीमध्ये सुदर्शन कंपनी धाटावतर्फे माझा कचरा माझी जबाबदारी अंतर्गत सर्वक्षण कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी नो -हाऊ फाऊंडेशन इनोरा पुणे येथून आभा तडवळकर, कुमार ओव्हाळ, विजय भालेकर, आदित्य जोशी, विनय देशमुख, चेतन चौधरी, अमर चांदणे. व सुदर्शन केमिकल्स प्रा.लि. रोहा येथील अधिकारी तसेच रविंद्र मरवडे, संदिप मरवडे, राम मरवडे, वसंत मरवडे, दयाराम मरवडे, हरिश्चंद्र मांगुळकर, खेळू मरवडे, आदी उपस्थित होते.

अलिबाग-रोहा रस्त्याचे काम जोरात

। अलिबाग । प्रतिनिधी ।
अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम जोरात सुरू आहे. बेलकडे ते वावेपर्यंत डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून, वेलवली खानाव ते उसरपर्यंत सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. आधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून हे काम करण्यात येत आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिक, प्रवासी त्रस्त झाले होते. आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील यांच्या पुढाकाराने या रस्त्यासाठी सरकारकडे निधी मंजूर करण्याची मागणी केली.

त्यानुसार या रस्त्यासाठी निधी मंजूर झाला. निविदा प्रक्रिया, ठेकेदार बदलणे अशा अनेक कारणांमुळे या रस्त्याचे काम लांबणीवर गेले होते. अखेर गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात केली.

अलिबाग-रोहा मार्गावरील वावेपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. काही ठिकाणी रुंदीकरणाचे काम सुरु आहे. ज्या ठिकाणी पावसाळ्यात पाणी साचले जाते, रस्ते खराब होण्याचे प्रमाण अधिक आहे, अशा १५ किलोमीटरच्या अंतरावर काँक्रिटीकरणाचे काम सुरु करण्यात आले आहे. वेलवली खानाव ते उसर येथील गेल कंपनीच्या प्रवेशद्वारापर्यंत सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण व्हावे यासाठी अद्ययावत मशीनद्वारे केले जात आहे. दिवसभर या मार्गावर

वाहनांची वर्दळ प्रचंड असते. वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होण्याचा धोका अधिक आहे. त्यामुळे रात्रीच्यावेळी करण्यात येत आहे. त्यामुळे लवकरच हा रस्ता खड्डेमुक्त होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे.

वाढत्या तापमानाचा लग्न समारंभास फटका

। खांब-रोहा । वार्ताहर ।

दिवसेंदिवस तापमानाचा पारा अधिकाधिक चढत चालला असल्याने प्रत्येका जीव अगदी कासावीस होत आहे. त्यामुळे सध्या मोठ्या धामधुमीत सुरू असलेल्या विवाह सोहळ्यावर त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत. दुपारच्या लग्न समारंभासाठी लग्न मंडपही आता ओस पडू लागले आहेत.

सकाळी १० वाजल्यापासून ते सायं. ४ वाजेपर्यंत तीव्र स्वरूपाच्या उन्हाचे चटके सोसावे लागत असल्याने या वेळेत सहसा घराबाहेर पडण्याचे प्रत्येकजण टाळू लागला आहे. त्यामुळे दुपारच्या सुमारास संपन्न होत असणाऱ्या विवाह सोहळ्यास जाण्यास टाळाटाळ केली जाते.

यजमानांचे जवळचे नातेवाईक व मित्र परिवार सोडून अन्य मंडळी शक्यतो दुपारी विवाह सोहळ्यास जात नसल्याने दुपारच्या सुमारास विवाह

सोहळ्यास तुरळक गर्दी आढळून येत आहे.

सध्या अवकाळी पावसाच्या स्थितीमुळे ढगाळ परिस्थितीमुळे तापमानातही वाढ झाल्याने तापमानाने मोठाच उच्चांक गाठला असल्याने वाढत्या उष्णतेचे घशाला कोरड पडणे, थकवा येणे, अंगाची लाही लाही होणे, मोठ्या प्रमाणावर घाम येणे आदी शरीरावर होणारे परिणामही चांगलेच जाणवू लागले आहेत. त्यामुळे उष्णतेचा शरिरावर परिणाम होऊ नये यासाठी प्रत्येकजण काळजी घेताना दिसत आहे.

माणगावमध्ये नेत्र शिबीर

। माणगाव । वार्ताहर ।

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार (दि.१०) नेत्र शिबीर वृत्तपत्र विक्रेते बाळकृष्ण मेथा यांचे हॉल जुने एसटी स्टँडजवळ माणगाव याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ६० रुग्णांची तपासणी करून १० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते .

गेली दहा महिन्यांपासून शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजय मेथा यांच्यावतीने मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरात आतापर्यंत ७५० हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. सदर शिबिरास विजय मेथा, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे, प्रसाद कांबळे, प्रकाश पाटील व त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

माथेरानमध्ये प्लास्टिक गोडाऊनला आग

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमधील हुतात्मा स्मारक कम्युनिटी सेंटर बाजूला असलेल्या वेस्ट प्लास्टिक गोडाऊनला शुक्रवार (दि.१२) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास आग लागल्याचे सफाई कामगारांच्या निदर्शनास आले. त्यांनी आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले पण या गोडाऊनमध्ये वेस्ट प्लास्टिक, त्याचप्रमाणे पुठ्ठे असल्याने आगीचा भडका, धूर जास्त असल्याने त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. आग विझविण्यासाठी नगरपरिषदेच्या आग्नीशमन गाडीला पाचारण करण्यात आले अखेरीस अथक

> सकाळी आग लागल्याने धुराचे लोट पसरले होते. आम्ही आमच्या कामगारांमार्फत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले आगीतील सर्व नष्ट झालेला कचरा अन्य ठिकाणी हलविण्यात येत आहे.
> -नरेंद्र सावंत
> आरोग्य निरीक्षक माथेरान नगरपरिषद

प्रयत्नांनंतर तीन चार तासांनी आग विझविण्यात यश आले. आगीत जीवीत हानी झाली नसली तरीसुध्दा काही झाडांना याची झळ पोहोचली आहे.

आग विझविण्यासाठी नगरपालिका स्वच्छ्ता विभाग कर्मचारी अन्सार महापुळे, कैलास सोनावळे, विश्वास सातपुते, नरेंद्र सावंत, उमेश लोखंडे, प्रवीण शिंदे, अजिंक्य सुतार, कर्मचारी ,महिला पुरूष वर्गाने मोठे परिश्रम घेतले.

मान्सूनपूर्व कामांना मुहूर्त केव्हा?

। माथेरान । वार्ताहर ।

काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपलेला असताना माथेरान या पर्यटनस्थळावर अद्यापही आपत्कालीन व्यवस्थे बाबतीत नियोजन करण्यात आलेले नसल्याने भूमिपुत्रांनी नाराजी व्यक्त केली आहे.

माथेरान हे स्थळ १२०० एकरांच्या परिसरात एकूण ५२ किलोमीटरमध्ये वसलेले घनदाट जंगलव्याप्त थंड हवेचे ठिकाण असून येथे पावसाचे प्रमाण सरासरी २५० ते ३०० इंच इतके असते संपूर्ण उताराचा भाग असल्यामुळे याठिकाणी पाणी साठून रहात नाही. परंतु एमएमआरडीएने बांधलेली

गटारे अत्यंत निमुळती असून त्यातून पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही. हे पाणी रस्त्यावरून वाहते, त्यामुळे क्ले पेव्हर रस्त्याची दुर्दशा होण्याच्या मार्गावर आहे. दरवर्षी पावसाळ्यात नगरपरिषदेच्या माध्यमातून रस्त्याला बांध घातले जातात त्याबाबत अद्यापही कोणत्याही प्रकारचे काम करण्यात आलेली नाही. डोंगराळ भाग असल्याने पावसाचे प्रमाण अधिक असते त्यामुळे मातीची धूप होत असून परिणामी अतिवृष्टीत झाडे उन्मळून पडतात. अनेक ठिकाणी धोकादायक जागा झालेल्या आहेत त्यामुळे पावसाळ्यापूर्वी आपत्कालीन प्रक्रिया आहेत त्या युद्धपातळीवर पूर्ण कराव्यात असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्व वयोगटातील स्त्रीपुरुषांना सहजपणे इंग्लिश स्पीकिंग शिकवणारा शॉर्टकोर्स सर्वात जुना, अनुभवी. Johnson's class : 9822842810
- प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ-८८८८९३५७७५
- मोक्याच्या ठिकाणच्या तीन हजार फुटाचा हॉल भाडेतत्वावर देणे आहे. संपर्क : ९२२६३७९८४४
- अलिबागमध्ये १ फ्लॅट भाड्याने पाहिजे. संपर्क ८९७५९९३९२९ एजंन्ट क्षमस्व.
- Car driver required for car driving in Maharashtra, contact- 9324987050
- अलिबाग नगरपालिका हद्दीतील अलिबाग वरसोली हमरस्त्यावरील गर्गवरद हौ.सो.मधील रो हाऊस, प्रायव्हेट पार्किंग सोयी सहीत विकणे आहे. अेरीया १६०० square फुट संपर्क ९३२४९८३७८५/९४२३८९०२०१ Atul Haslani
- पुण्यात डॉक्टरचे घरी कामासाठी राहणारी मुलगी/बाई पाहिजे जेवणा खाण्यासहीत पगार रू. १०,०००/- संपर्क- ९४२२४३००२१, ७७५७८३४५२७, ८६००११२५०२.
- अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजे. Reception-Housekeeping-waiter-Helfer-cook etc. Phone-8208459424, 9323152990. email-csskshirishkar@gmail.com
- नामांकित कंपनीमध्ये टॅली, एक्सेलवर व जीएसटीची कामे करणारा अनुभवी अकाऊटंट आणि वॉचमन या पदासाठी प्रत्येकी एक उमेदवार पाहिजे मो.९९२२९०९९७१
- अलिबागपासून सुमारे नऊ किलोमीटरवर वढाव खुर्द येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन विकणे आहे. भरपूर पाणी व बांधकाम परवानगी उपलब्ध. संपर्क : सुबोध ७२७६५९१३०२
- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : ८७८८०२१५१०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

क्लिक

■ जागतिक परिचारिका दिनानिमित्त माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील परिचारिकांची शर्मिला सत्वे यांनी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. (छायाचित्र : सलीम शेख)

अलिबागच्या सुकन्येचा सातासमुद्रापार झेंडा

ज्युनियर आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी मनश्री शेडगेची भारतीय संघात निवड

। अलिबाग । भारत रांजणकर ।

जपान येथे २ ते ११ जूनदरम्यान होणाऱ्या महिला ज्युनिअर आशिया करंडक हॉकी स्पर्धेसाठी भारतीय ज्युनिअर महिला हॉकी संघाची निवड घोषणा करण्यात आली आहे. या भारतीय संघात अलिबाग तालुक्यातील तिनविरा गावची मनश्री नरेंद्र शेडगे हिचा समावेश करण्यात आला आहे. मनश्रीची निवड झाल्याने अलिबाग तालुक्यासह रायगड जिल्ह्यातून तिचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. मनश्रीने महाराष्ट्राच्या संघाचे नेतृत्वही केले आहे.

जपानमध्ये होणाऱ्या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या या स्पर्धेसाठी हॉकी इंडियाने बुधवारी १८ सदस्यांचा भारतीय महिला कनिष्ठ हॉकी संघ जाहीर केला. यात मनश्री शेडगे हिचादेखील समावेश केला आहे. या स्पर्धेत भारताचा अ गटात समावेश असून, कोरिया, मलेशिया, चीन, तैपेई आणि उझ्बेकिस्तान या संघांचा सहभाग आहे. तर ब गटात यजमान जपान, चीन, कझाकस्तान, हाँगकाँग, इंडोनेशिया यांचा समावेश राहील. या स्पर्धेतील पहिले तीन संघ २०२३ साली होणाऱ्या आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कनिष्ठ महिलांच्या विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी थेट पात्र ठरतील. भारतीय संघाचे उपकर्णधारपद दीपिकाकडे सोपवण्यात आले आहे.

या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना ३ जूनला उझ्बेकबरोबर, दुसरा सामना मलेशियाबरोबर ५ जूनला, तिसरा सामना ६

जूनला कोरियाबरोबर, तसेच चौथा सामना चीन तैपेईबरोबर ८ जूनला खेळवला जाईल. या स्पर्धेतील उपांत्य सामने १० जूनला तर अंतिम सामना ११ जूनला आयोजित केला आहे.

भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघ - गोलरक्षक- माधुरी किंडो, आदिती माहेश्वरी, बचावफळी- महिमा टेटे, प्रिती (कर्णधार), निलम, रोपनीकुमारी, अंजली बरवा, मध्यफळी- ऋतुजा पिसाळ, मंजू चोरसिया, ज्योती छत्री, वैष्णवी फाळके, सुजाता कुजूर, मनश्री शेडगे, आघाडीफळी- मुमताज खान, दिपिका (उपकर्णधार), दीपिका सोरेंग, अणू, सुनेलिता टोप्पो.

अलिबाग तिनवीरा गावची युवा खेळाडू असलेली मनश्री नरेंद्र शेडगे ही पहिल्यापासूनच अनेक खेळांमध्ये तरबेज होती. त्यामुळे शासनाच्या ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्याच्या उपक्रमांतर्गत तिला हॉकी प्रशिक्षणाची संधी मिळाली, या संधीचे सोने मनश्रीने केले आहे. मनश्रीचे प्राथमिक शिक्षण चरी येथे झाले असून, त्यानंतर ती पुण्यामध्ये पुढील शिक्षणासाठी गेली होती. तेथेच तिला हॉकीचे धडे मिळाले. गेल्याच वर्षी महाराष्ट्राच्या कर्णधारपदी मनश्रीची निवड करण्यात आली होती. तिथे केलेल्या चमकदार कामगिरीची दखल घेत तिची निवड राष्ट्रीय संघात करण्यात आल्याची बातमी वाऱ्यासारखी पोहोचताच अलिबाग तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात समाजमाध्यमांवरुन मनश्रीवर अभिनंदनाचा वर्षाव सुरु झाला आहे.

गाय-वासराची कत्तल करणारा गजाआड

। वावोशी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील महड गावातील शेतकरी तुषार दत्तू पाटील यांच्या मालकीची गाय आणि तिचे लहान वासरांची २ मे रोजी गोठ्यातून चोरी होऊन एका पत्र्याचे शेडमध्ये या हत्या करण्यात आली होती. त्यामुळे खालापूर पोलिसांनी गोठयाचे मालक

हुसेन अब्दुल लतीफ बेडेकर व त्यांचा मुलगा शहानवाज हुसेन बेडेकर यांना तात्काळ ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुन्ह्याचा तपास चालू केला. सदर ठिकाणचे नमुने तपासणी करीता घेऊन व आरोपी यांना अटक करून त्यांनी गुन्हयाचा तपास पुढे सुरू केला.

या गुन्ह्याच्या तपासात आरोपी हुसेन बेडेकर व त्यांचा भाऊ शेख महमंद बेडेकर यांच्यामध्ये जमीनीच्या हिस्सा वाटपावरून वाद चालू असल्यामुळे शेख महमंद बेडेकर यांनी मनात राग धरून सदरचे कृत्य केले असल्याची खात्रीशीर माहीती पोलिसांना मिळाली. तांत्रिक बाबीची पडताळणी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचेकडे चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधीकारी विजय लगारे यांचे मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, गणेश कराड, प्रदिप आरोटे, पोलीस हवालदार बागुल, शेडगे, सावंत, कांबळे, धनवी, सुतार, वाढवे, कोकाटे, व इतर पोलीस स्टाफने सदरचा गुन्हा कसोशीने तपासा करून गुन्हयातील खऱ्या आरोपींचा शोध घेवून त्यांना बेड्या ठोकलेल्या आहेत.

निकालानंतरची संधी

सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला, पण न्याय झाला नाही अशी अनेकांची प्रतिक्रिया झाली. एकनाथ शिंदे सरकार येण्यासाठी अनेक बेकायदा गोष्टी केल्या गेल्या. त्यावर न्यायालयाने ताशेरे मारले. पण संबंधित दोषींना सजा काय द्यावी हे सांगितलेच नाही. बेकायदेशीरपणाच्या आधारे चालू असलेली गोष्ट बंदही केली नाही. मुंबईच्या कॅम्पा कोला कम्पाऊंडमधील उच्चभ्रूंच्या इमारती किंवा दिल्लीचे सुपरटेक टॉवर ही कुतुबमिनारहूनही उंच असलेली इमारत यांचे उदाहरण आहे. बेकायदा असल्याचे सिद्ध झाल्यावर त्या पाडाव्यात असे आदेश न्यायालयाने दिले. मधल्या काळात महापालिकेने त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले होते किंवा लोक तेथे राहत होते या सबबी मान्य केल्या गेल्या नाहीत. बेकायदा पायावर उभ्या असलेल्या शिंदे सरकारच्या इमारतीला देखील हाच न्याय लागू शकला असता. न्यायालयाने ते केले नाही. मात्र, तसे न करता जे ताशेरे मारले आहेत ते इतके जोरदार आहेत की त्यांच्या आधारे विरोधकांचे राजकारण पुढे जाऊ शकते. उद्धव ठाकरे यांनी स्वतःहून राजीनामा दिला नसता व अविश्वास ठरावाला ते सामोरे गेले असते तर आम्ही त्यांना पुन्हा या पदावर स्थापन करण्याचा विचार करू शकलो असतो असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे ठाकरे यांनी राजीनाम्याची घाई केली असा दोष काल त्यांना अनेकांनी दिला. पण न्यायालयाचे हे वाक्य ही दुधारी तलवार आहे. ठाकरे यांच्या राजीनाम्यामुळे पूर्वस्थिती बहाल होऊ शकत नाही याचाच अर्थ शिंदे यांचे आज त्या पदावर कायम राहणे हा कायद्याच्या नाइलाजाचा भाग आहे. केवळ तांत्रिक आधारावर ते तिथे आहेत. हा एकच मुद्दा आघाडीला भाजपविरुध्द लढण्यासाठी पुरेसा आहे. पण या युध्दाची आखणी काळजीपूर्वक करायला हवी. शिंदे सरकारला शेलक्या व वाह्यात शिव्या देण्याचे तोंडी राजकारण करणे उपयोगाचे नाही. त्याचा उलटाच परिणाम होण्याचा धोका आहे. संजय राऊत यांच्यासारख्यांवर तर त्वरीत नियंत्रण आणायला हवे.

आता तरी एकत्र या

ही लढाई महाविकास आघाडीने एकत्रितपणे लढायला हवी. काल खरे तर या निकालानंतर तिन्ही पक्षाच्या नेत्यांची बैठक होणे गरजेचे होते. त्यात पुढचे डावपेच ठरवले जायला हवे होते. पण सेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे नेते एकमेकांशी थेट कमी आणि पत्रकार परिषदांमधूनच अधिक बोलतात. हे बोलणे म्हणजे बहुतेकदा एकमेकांना इशारेच असतात. राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांपाशी आघाडी सरकारे चालवण्याचा अनुभव आहे. आघाड्यांमध्ये नेहमीच मतभेद असतात. पण म्हणून रोज उठून एकदुसऱ्यावर जाहीर हल्ले करण्याचे प्रकार घडत नाहीत. अडीच वर्षे सत्तेत एकत्र राहिल्यानंतरही महाविकास आघाडीच्या नेत्यांना हे शहाणपण आले नसेल तर कठीण आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल ही त्यांच्यासाठी सोन्यासारखी आणि कदाचित अखेरची संधी आहे. या निकालाचा आशय जनतेत योग्य रीतीने पोचवला गेला तर आघाडीला सत्तेत परत येण्याची वाट गवसू शकेल. या नेत्यांनी तसे प्रयत्न करायला हवेत. कालच्या निकालानंतर आमचाच विजय झाला असे एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या डौलात जाहीर केले. पण प्रतोद गोगावले यांची नियुक्ती बेकायदा ठरवली जाणे किंवा राज्यपालांवर मारलेले कडक ताशेरे याबाबतच्या प्रश्नांना त्यांनी बगल दिली. ताशेरे मारले तरी शेवटी निर्णय आमच्या बाजूनेच झाला ना असे निलाजरे उद्गार त्यांनी काढले. उद्धव यांनी आपल्याला नैतिकता शिकवू नये असेही ते म्हणाले. अलिकडे, आपल्यावर कोणताही आरोप झाला की काँग्रेसने वा नेहरूंनी काय केले असा प्रश्न विचारण्याची एक पध्दत भाजपने या देशात रूढ केली आहे. तिचाच हा आविष्कार आहे. आपण जनतेला बांधील आहोत आणि आपली म्हणून स्वतःची नैतिकता हवी हे बहुदा ते विसरून गेले आहेत. अर्थात, जनता ते विसरलेली नाही हे निवडणुकीत दिसेलच.

संघर्ष बाकी

सोळा आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी अध्यक्ष राहुल नार्वेकरांपुढे लवकरच सुरू होईल. गोगावले यांची नियुक्ती रद्द झाली आहे. आता शिंदे गट हाच मूळ पक्ष आहे असे म्हणून त्यांनाच पुन्हा प्रतोद करण्याच्या हालचाली चालू आहेत. पण ठाकरे गटाने गेल्या वर्षी बजावलेले पक्षादेश आणि शिंदे गटाच्या आमदारांनी केलेले त्यांचे उल्लंघन हे पूर्वलक्षी प्रभावाने कायदेशीर ठरवता येणार नाही. नार्वेकर यांनी तसे केले तर ते प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयात जाईल. त्यावेळी न्यायालय काय भूमिका घेते हे पाहणे उद्बोधक ठरेल. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला बहाल केलेले पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह याबाबतही न्यायालयाने कालच्या निकालात आक्षेप घेतले आहेत. त्यासाठीही आणखी एक दावा लढवावा लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे या प्रकरणांमध्ये सेनेसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. ती प्रकरणे लढताना आघाडी एकजुटीने सेनेच्या मागे उभी राहिली तर मतदारांना अधिक चांगला संदेश जाईल. एका दृष्टीने उद्धव ठाकरे यांना पुनर्स्थापित न करण्याचा निर्णय म्हणजे आकाशीची कुऱ्हाड नव्हे तर वरदानच समजता येईल. उद्धव यांची सत्ता, उस्फूर्त बंडामुळे नव्हे तर कारस्थानामुळे गेली हे मतदारांना आघाडीचे नेते अधिक प्रभावीपणे सांगू शकतात. शिंदे यांच्याकडे आता चाळीस आमदार व बहुसंख्य खासदार आहेत. त्यामुळे त्यांची बंडाळी ही आता नैसर्गिक वाटते. मात्र मुळात इडी आणि सीबीआय चौकशांच्या धाकामुळेच बहुसंख्य लोक शिंदे यांच्यासोबत गेले. खुद्द शिंदे यांच्याबाबतही हेच म्हटले जाते. कोणत्याही स्थितीत महाराष्ट्रासारख्या श्रीमंत राज्याची सत्ता आपल्याकडे हवी या उद्देशातून भाजपने आखलेला तो कपटी डाव होता. त्यात केंद्रातील सत्ता, पोलिस, पैसा यांचा वापर करण्यात आला. हे कपट उघडे पाडण्यासाठी वेगळी भाषणबाजी करण्याची आघाडीच्या नेत्यांना आता गरज नाही. त्यांनी केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातले उतारे वाचून दाखवले तरी पुरण्यासारखे आहे.

विचार

हिंसाचार थांबला; मने दुभंगलेली

धुमसणारे मणिपूर शांत झाले तरी तिथल्या स्थानिकांची मने दुभंगलेली आहेत. मेतेई समाजातील लोकांना अनुसूचित जमातीचा दर्जा मिळाल्यास ते डोंगराळ भागात स्थायिक होऊन जमिनी खरेदी करू शकतील, अशी भीती वाटल्याने इथला आदिवासी समाज आक्रमक झाला. पुढे हिंसाचार उसळला आणि परिस्थिती चिघळत गेली. या स्थानिक बेदिलीला चीनचीही फूस आहे. हे वातावरण निवळण्यासाठी मणिपूरमध्ये सामुहिक प्रयत्नांची गरज आहे.

अजय तिवारी

मणिपूरमधील दंगलीत मोठ्या प्रमाणावर घरे जाळली गेली. त्यात मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. हिंसाचारामुळे आसाम, मिझोरामसह अन्य राज्यांमध्ये तसेच सुरक्षित भागात स्थलांतर करणाऱ्या नागरिकांची संख्या सुमारे १३ हजार आहे. मोरेहमधील मेतेई समुदायाच्या सुमारे तीनशे लोकांनी सीमा ओलांडून म्यानमारमध्ये आश्रय घेतला आहे. आसाममध्ये आतापर्यंत २,२५२ लोक स्थलांतरित झाले असून ३०० जण मिझोराममध्ये गेले आहेत. मणिपूरमधील हिंसाचारामुळे तीन हजारजणांना राज्याबाहेर जावे लागले आहे. मणिपूर उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे हिंसाचार झाल्याचे सांगितले जात असले, तरी ते तात्कालिक कारण आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांविरोधात स्वकीय आमदारांनीच पुकारलेले बंड आणि देशद्रोही संघटनांविरोधात थांबवलेली कारवाई अशा काही घटनांमधून या राज्यांतर्गत असंतोष वाढत होता. त्यात मणिपूर उच्च न्यायालयाने १९ एप्रिल रोजी एक निकाल दिला. त्यात सरकारला मेतेई समुदायाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याबाबत विचार करण्यास सांगितले होते. यानंतर राज्यातील आदिवासी समाजातील लोक संतप्त झाले. मेतेई समाजातील लोकांना अनुसूचित जमातीचा दर्जा मिळाल्यास ते डोंगराळ भागात स्थायिक होऊन जमिनी खरेदी करू शकतील, अशी भीती आदिवासी समाजाला वाटली. अशा परिस्थितीत आपल्या हितसंबंधांवर परिणाम होईल, असे वाटून मणिपूरच्या 'ऑल ट्रायबल स्टुडंट्स युनियन'ने मोर्चा काढला. यादरम्यान हिंसाचार उसळला आणि राज्यातली परिस्थिती चिघळत गेली.

इथे मणिपूरमधली नेमकी अस्वस्थता समजून घ्यायला हवी. या राज्यातला आदिवासी समाज नाराज आहे. हा समाज आपल्या रॅलीमध्ये बिगर आदिवासी मेतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या मागणीला विरोध करत होता. मणिपूरमध्ये मेतेई समाजाची लोकसंख्या ५३ टक्क्यांहून अधिक आहे. बहुसंख्य असलेला हा समाज गेल्या दहा वर्षांपासून अनुसूचित जमातीत समावेशाची मागणी करत आहे. बिगर आदिवासी समाजाच्या या मागणीला आदिवासी समाज विरोध करत आहे. इथे मेतेई समुदायाची लोकसंख्या ५३ टक्क्यांहून अधिक आहे; पण ते फक्त खोऱ्यातच स्थायिक होऊ शकतात. नागा आणि कुकी समाजाची लोकसंख्या सुमारे ४० टक्के आहे आणि ते राज्याच्या ९० टक्के क्षेत्रफळ असलेल्या डोंगराळ भागात स्थायिक आहेत. मणिपूरमधील एका कायद्यांतर्गत आदिवासींसाठी काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. याअंतर्गत डोंगराळ भागात फक्त आदिवासीच स्थायिक होऊ शकतात. मेतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा न मिळाल्याने ते डोंगराळ भागात स्थायिक होऊ शकत नाहीत तर नागा आणि कुकीसारखे आदिवासी समुदाय मात्र हवे असल्यास खोऱ्यात राहू शकतात. मेतेई आणि नागा-कुकी यांच्यातील वादाला हेच खरे कारण आहे.

मणिपूरमधील हिंसाचार आता थांबला असला तरी ठिकठिकाणी हल्लेखोरांनी उभारलेले अडथळे सुरक्षा दलांच्या मार्गात अडथळा ठरत आहेत. सुमारे दीड डझन पोलिस ठाण्यांमधून दंगलखोरांनी शस्त्रे लुटली आहेत. अशा शस्त्रांची संख्या ३५० हून अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे. हिंसाचाराचा सर्वाधिक फटका केंद्रीय राखीव दलाला बसला आहे. एका कोब्रा जवानाचा दंगलीत बळी गेला. याशिवाय दलातील जवान आणि अधिकाऱ्यांची घरे जाळण्यात आली. इम्फाळपासून ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या टिकाई खुनो गावात ५० हून अधिक घरे जाळण्यात आली. यापैकी अनेक घरे जवानांची होती. दंगलीमध्ये साठहून अधिक जणांचा मृत्यू झाला. ही सरकारी आकडेवारी आहे. त्याहून अधिकजणांचा बळी गेला असावा, असे स्थानिक सांगतात. मणिपूरमधील सर्वात मोठी समस्या म्हणजे पोलिस ठाण्यांमधून लुटलेली शस्त्रे आता दंगेखोरांच्या हाती आहेत. ही शस्त्रे सुरक्षा दलांच्या विरोधात वापरली जात आहेत. येथे झालेल्या वेगवेगळ्या चकमकींमध्ये हल्लेखोरांनी शस्त्रे लुटल्याची माहिती आहे. सायटन आणि टोरबुंग भागातही या शस्त्रांचा वापर करण्यात आला आहे. केंद्रीय राखीव दलाच्या वाहनांचेही नुकसान झाले आहे. मुख्य रस्त्यापासून दूर दुर्गम भागात रस्ता अडवल्याने सुरक्षा दलांना तिथे पोहोचता आलेले नाही. डोंगराळ भागात, बदमाश हिंसाचार करतात आणि लगेच पळून जातात. डोंगराळ भगातील हल्लेखोरांवर कोणाचेही नियंत्रण नाही. सरकारने दंगलीच्या काळात मोबाईल नेटवर्क बंद करण्याचे आदेश दिले होते; परंतु एका कंपनीचे नेटवर्क चालूच होते. यामुळे दंगलखोरांसाठी संवाद, संपर्काचे साधन सुरूच होते.

मणिपूरमधील दोन समाज एक दुसऱ्याच्या जीवावर उठले असताना दुसरीकडे माणुसकी जिवंत असल्याचे उदाहरण इतरांच्या डोळ्यात अंजन घालत होते. मणिपूरमध्ये नुकत्याच झालेल्या हिंसाचारानंतर कुकी समाजाच्या महिलांनी मेतेई समुदायाला जमावापासून वाचवण्यासाठी आणि चुराचंदपूरमध्ये लष्कराच्या वाहनांमध्ये चढण्यासाठी वेळ देण्यासाठी मानवी साखळी तयार केली. सैन्य मेतेई समुदायाच्या लोकांना हिंसाचारग्रस्त भागातून बाहेर काढत होते आणि कुकी महिलांनी अथक प्रयत्न करुन जमावाला नुकसान होऊ दिले नाही. हिंसाग्रस्त भागातून लोकांना सुरक्षिततेसाठी बाहेर काढत असताना, महिला रस्त्यावर रांगेत उभ्या राहिल्या आणि जमावाला पुढे जाऊ दिले नाही. मेतेई समुदायातील मुलींनी मणिपूर विद्यापीठातील कुकी विद्यार्थ्यांना संरक्षण दिले आणि हे सर्व होत असताना काहीजण जातीय तणावाचा आनंद घेत होते. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी या काळात शांततेचे आवाहन केले होते. मणिपूरच्या 'ऑल ट्रायबल स्टुडंट्स युनियन ऑफ मणिपूर'ने एकता मोर्चा काढला; परंतु त्या वेळी चुराचंदपूर येथील अँग्लो-कुकी वॉर मेमोरियल गेटचा काही भाग जाळला गेला. मोर्चा शांततेत संपला होता; परंतु युद्ध स्मारक पेटवण्यात आले, तेव्हा दंगल भडकली. मेतेई आणि इतर आदिवासींमध्ये दंगल झाली. इम्फाळ आणि इतर गैर-आदिवासी भागात चर्च, आदिवासींची (विशेषतः कुकी लोकांची) निवासस्थाने असून त्यांच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांना लक्ष्य करून नुकसान केले.

दुसरीकडे, मेतेई अल्पसंख्याक असलेल्या भागांमधून अशीच तोडफोड आणि जाळपोळ झाली. मुख्यत्वे इंफाळ खोऱ्यात राहणारे मेतेई हे हिंदू आहेत तर राज्यातील डोंगराळ जिल्ह्यांमध्ये राहणारे कुकी आणि नागा हे बहुतांश ख्रिस्ती आहेत. मेतेई प्रामुख्याने राज्यातील इम्फाळ खोऱ्यात वसले आहेत. ते एकूण भूभागाच्या सुमारे दहा टक्के आहेत. दुसरीकडे, आदिवासी (ज्यामध्ये प्रामुख्याने नागा आणि कुकी यांचा समावेश आहे) हे लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के आहेत, ते प्रामुख्याने डोंगराळ जिल्ह्यांमध्ये राहतात. ते राहत असलेले क्षेत्र मणिपूरच्या क्षेत्रफळाच्या सुमारे ९० टक्के आहे. बहुसंख्य समुदाय असण्याव्यतिरिक्त, मेतेईंना राज्य विधानसभेत अधिक प्रतिनिधित्व मिळते.

कारण मणिपूरमधील एकूण ६० विधानसभा जागांपैकी ४० जागा इम्फाळ खोऱ्यात आहेत. १९४७ मध्ये स्वातंत्र्यापूर्वी, मणिपूरच्या राजाने इंफाळ खोरे आणि डोंगरी जिल्ह्यांचे प्रशासन करण्यासाठी दोन कायदे केले. एक होता खोऱ्यातील लोकांसाठी मणिपूर राज्य घटना कायदा आणि दुसरा होता प्रामुख्याने डोंगराळ भागात राहणाऱ्यांसाठी. मणिपूर भारतीय संघराज्यात सामील झाल्यानंतरही दोन्ही प्रदेशांच्या प्रशासनातील फरक कायम होता. मणिपूरमध्ये मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांना हटवण्याची मागणी सातत्याने होत आहे. बिरेन सिंग यांच्यामुळे संतप्त झालेल्या आमदारांनी दिल्लीत तळ ठोकून राज्याचे प्रभारी प्रवक्ते संबित पात्रा यांची भेट घेत मुख्यमंत्र्यांना हटवण्याची मागणी केली. मुख्यमंत्र्यांच्या कार्यपद्धतीबद्दल संतप्त आमदारांनी संबित पात्रा यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येते.

राज्यातील परिस्थिती पाहता मुख्यमंत्र्यांची हकालपट्टी किंवा मंत्रिमंडळात फेरबदल करण्याची मागणी त्यांनी केली. पात्रा यांनी या आमदारांना सांगितले की, पक्षाच्या व्यासपीठावर त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष देऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. मणिपूर सरकारच्या विविध महामंडळे आणि संस्थांमध्ये अध्यक्षपदाची जबाबदारी असलेले आणखी काही आमदार सरकारी पदांचा राजीनामा देऊ शकतात, असे सांगण्यात येत आहे. विधानसभेचे भाजप आमदार करम श्याम यांनीदेखील मुख्यमंत्र्यांवर मणिपूर पर्यटन महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी न दिल्याचा आरोप करत राजीनामा दिला. एकीकडे राजकीय अस्थिरता आणि दुसरीकडे समाजात पडलेली दुही यामुळे मणिपूर अस्थिर आहे.

आजकाल

न्यायिक शहाणपण विसरले?

असीम सरोदे

मी ज्या शक्यता वर्तवल्या होत्या त्यातील पहिल्या शक्यतेनुसार महाराष्ट्र सत्ता संघर्षाचे प्रकरण विधिमंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्यात आलेले आहे.दुसरी गोष्ट शक्यता म्हणून मी लिहिली होती की राज्यपालांनी दिलेला बहुमत चाचणीचा आदेश चुकीचा ठरवला जाईल व काहीही निर्णय झाला तरी राज्यपाल कोशियारी घटनाबाह्य वागले असे ताशेरे न्यायालय ओढले व तसेच झाले आहे. पण सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय पूर्णपणे बरोबर आहे असे म्हणता येत नाही. मी लवकरच यावर विस्तृत विश्लेषण करणार आहे.

आता त्वरित काही बाबी जाणवल्या त्या म्हणजे-

अनेक असंवैधनिक घडामोडींची दखल घेऊन कुणाचे चुकले याची व्यवस्थित दखल घेऊनही संविधानिक मार्गावर घेऊन न जाणारा हा निर्णय आहे. प्रतोद चुकीचा, त्यांनी काढलेला व्हीप चुकीचा , गोगावले यांना प्रतोद म्हणून मान्यता देणे बेकायदेशीर व राज्यपालांनी घेतलेला बहुमत चाचणीचा निर्णयही चुकीचा तर मग अश्या बेकायदेशीरतेच्या मार्गाने आरूढ झालेले सरकार सर्वोच्च न्यायालयानेच कलम १४२ चा अधिकार वापरून घटनाबाह्य जाहीर करायला हवे होते तरच ' संपूर्ण न्याय' झाला असता. हा निर्णय खरोखर कडक संविधानिक चौकटीत देण्याचा प्रयत्न झाला असता तर एकमुखी निर्णय झालाच नसता.

प्रतोद म्हणून भरत गोगावलेंची निवडच बेकायदा होती तर त्या प्रतोदांनी जो मतदान करण्याचा व्हीप काढला तो बेकायदेशीर नव्हता का? आणि तो बेकायदेशीर असेल तर चाचणीत मिळालेलं बहुमत कायदेशीर कसं हा प्रश्न न्यायालयाने लक्षात घ्यायला हवा होता.

व्हीप पक्षप्रमुख काढू शकतात, संसदीय गटाचा नेता काढू शकत नाही असे सुप्रीम कोर्ट म्हणते मग उद्धव ठाकरेंनी काढलेला व्हीप खरा असा त्याचा अर्थ आहे कारण तोपर्यंत शिंदे गटाला निवडणूक आयोगाची मान्यता मिळालेली नव्हती. याचा अर्थ ज्यांनी उद्धव ठाकरेंच्या व्हीपला न जुमानता मत दिलं ते पक्षांतरबंदी कायद्याच्या कक्षेत फुटीर ठरतात आणि म्हणून ते पक्षविरोधी कारवाया करण्यासाठी अपात्र ठरतात.

राज्यपालांनी ज्या एकनाथ शिंदे व त्यांच्या सोबतच्या आमदारांना कायदेशीर चौकटीतील कोणतीच ओळख नव्हती त्यांच्या पत्रानुसार बहुमत चाचणी घेतली असे न्यायालयाचे मत आहे मग ती चाचणीच अवैध असेल तर त्या बहुमत चाचणीचा निर्णय वैध कसा? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून निर्माण झालेला आहे. विधिमंडळाला स्वायत्तता आहेत पण ' सातत्याने गुन्हेगारी खोडसाळपणा' करीत सत्ता बळकावणाऱ्या समूहाने केलेले विधानसभा अध्यक्ष घटनेनुसार वागतील असे न्यायालयाने कशाच्या आधारे गृहीत धरले? ' रिझनेबल कालावधीत' अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा असे सांगताना वाजवी कालावधी ची व्याख्या नसल्याने त्याचा गैरफायदा घेण्याचे मार्ग न्यायालयाने खुले ठेवणे अयोग्य आहे.

सुप्रीम कोर्टाने ही केस केवळ निकालात काढली आहे संविधानाच्या चौकटीत बसणारा 'न्याय' केलेला नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

देवेंद्र फडणवीसांनी राज्यपालांना पत्र न देता विधानसभेत अविश्वास ठराव आणायला हवा होता अश्या स्वरूपाचे वक्तव्य एकीकडे सर्वोच्च न्यायालय करते व पुढे त्या पत्रावर राज्यपालांनी कारवाई करणं चूक होतं असेही नमूद केले आहे तर मग या घटनाबाह्य कृतींचा काहीच हिशोब न करता बेकायदेशीररीत्या स्थापन सरकार सुरू ठेवण्याची मुभाच देणारा हा निर्णय अयोग्य आहे.

सगळ्यांनी केलेल्या चुका निरीक्षण म्हणून लिहायच्या व ज्याच्यावर अन्याय झाला त्या तक्रारदारालाच जणू शिक्षा करणारा हा निर्णय न्यायतर्क निकामी करणारा आहे असे मला वाटते.

केवळ उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिला म्हणून बेकायदा सरकार आपोआप कायदेशीर आहे असे समजायचे हा न्यायालयाचा तर्क अनाकलनीय आहे. राजीनामा देण्याआधी झालेल्या बेकायदेशीर व घटनाबाह्य पक्षविरोधी कारवायांचा आणि दहाव्या परिशिष्टातील परिच्छेद २ (१) (अ) यांचा काहीच अनव्यार्थ न काढणारे न्यायालय न्यायिक शहाणपण (जुडीशिअल विजडम) वापरायला विसरल्याने हा निर्णय गोंधळात टाकणारा आहे असे मला वाटते.

व्हायरल

लोकांमध्ये द्वेष नसतोच

माझं सांगलीतलं एक छोटंसं गाव. नुकतंच तिथं गावच्या जत्रेला जाणं झालं. २००७-०८ च्या मिरज दंगलीपासून गावात बऱ्यापैकी संभाजी भिडे-भाजप-शिवसेना असं हिंदुत्व शिरलेलं. परवाच्या जत्रेत गाव शीण बाजूला सारून आनंद घ्यायला तयार होतं.

गावात वर्षानुवर्षं जत्रेत आमच्या घरासमोरच एकच भेळीचा गाडा लागतो. त्या गाड्याचे मालक शेजारच्या गावातलं मुस्लिम कुटुंब आहे. माशाल्लाह सांगली भेळ खायला पूर्ण हिंदू अभिमानी गावाला काहीही गैर वाटत नाही. जत्रेत लहान मोठी खेळणी विकणारे, बांगड्या विकणारे अनेक मुस्लिम दिसले. बाजूला डॉल्बी आणि डीजे सिस्टम वाजतच होतं....गाणं सुरू होतं, भारत का बच्चा बच्चा, जय जय श्रीराम बोलेगा...

त्याच गावात त्याच रात्री, जत्रेची गर्दी आपल्या आपल्या घरी गेली की अगदी देवभोळ्या आमच्या घरातून समोरचा गाडा आवरायला घेतलेल्या भाभीना जेवणाचं ताट जातं...आणि कोणालाही काहीही वावगं वाटत नाही...

मुद्दा हा नाही की गावं चांगलीच असतात, किंवा त्यांच्यात द्वेष नसेलच. मुद्दा हा आहे की ही द्वेषपूर्ण गाणी, लेखणी, विचार, काश्मीर फाईल्स, केरला स्टोरी, ही सगळी कृत्रिमरीत्या आणली गेलेली सूज आहे. लोक मुळात तसे नसतात कारण त्यांना ठाऊक असतं मारामारी आणि द्वेष व्यवहार्य नाहीत, परवडणारे नाहीत.

केरळ स्टोरी मधला मुसलमान वाईट असेल कदाचित, पण समोर थांबलेली मेहनती मुस्लिम बाई दिसते तेव्हा क्वचितच तिच्यात कोणाला जिहादी दिसतं...नकळतपणे त्यांचं मन मान्य करत असतं की क्रूर जिहादी मुस्लिम हा कल्पनेतल्या विश्वातलं एक द्वेषाचं निमित्त मात्र आहे...

मुद्दा हा आहे की ही सूज या प्रेमळ किंवा प्रेमळ नसतील तरी व्यवहार्य लोकांमध्ये आली कुठून? गावात वाचनालय आहे, पण नवीन पुस्तकं नाहीत, आधी घरोघरी पेपर यायचा, तो बंद झाला, सहकारी दूध आणि साखर संघ मोडकळीस आले, गावातली शाळा देखरेखीअभावी निकृष्ट अवस्थेत आहे, गावात एखादा मास्तर-तत्त्वज्ञानी-प्रबोधनकार येऊन जमाना झाला...

पण गावात कोण येतं माहितीये? संभाजी भिडेंचे लोक येतात, स्वाध्यायवाले येतात, कीर्तनकार येतात, डॉल्बीवले येतात, धर्मगुरू येतात...ते पोहोचतात, ते बोलतात, त्यांच्याशी संवाद होतो, म्हणून त्यांनी दिलेल्या क्लिप फिरतात, त्यांनी दिलेली गाणी वाजतात आणि वर्तनात नसली तरी परिसरात हिंदुत्वाची सूज दिसू लागते...ती काही हिंदुत्व कळलंय, ते आत्मसात केलंय म्हणून नव्हे...

हे कधी दिसणार अकादमीक विश्लेषकांना, पुरोगामी कार्यकर्त्यांना, लेखकांना, विचारवंतांना? लोक द्वेषपूर्ण नसतात, किमान आपोआप ते तसे बनत नसतात. लोक प्रेमाचे, आपुलकीनं विचारण्याचे भुकेले असतात... त्यांनी हिंदुत्व नाही तर त्याच्यामागचा संपर्क स्वीकारला आहे...ती सूज आली कारण आपल्याकडून पोकळी निर्माण झाली....हे कळलं तरच आपल्याला ती सूज उतरवता येईल....घरी बसून, फेसबुकवर लिहून, एसी सभागृहात भाषण करून हे बदलणार नाही...लोकांमध्ये जावं लागेल...

- प्रथमेश पाटील

.....

आपण बँकेत जातो तेव्हा पेन मागणार कोणीतरी भेटतंच. आपणही थोडं मनातल्या मनात कुरकुरत ते देतो. मयंक मात्र हुशार तो पेन द्यायचा पण टोपण आपल्याकडे ठेवायचा म्हणजे पेन घेणारा ते परत करायला विसरून जाण्याचा प्रश्न नाही आणि फक्त पेन घेऊन तर कोणी जाणार नाही.

एकदा मयंकने असेच एकाला पेन दिले, त्याला वाटलं तो पाच मिनिटांनी परत करेल तर उलट त्या माणसाने मयंकलाच टोपण मागितले. मयंक म्हणाला असे कसे पेन माझे आहे तू ते परत कर.

तो माणूस म्हणतो पेन माझ्या हातात आहे तू मला टोपण दे.

मॅटर कोर्टात गेलं, कोर्टाने मंयकला विचारलं, पेन तुझं असेल पण त्याने बळजबरी न करता तू ते त्याला दिलं म्हणजे तुला ते पेन त्याला द्यायचं होतं.

आता तू त्याला टोपण देऊन टाक नाहीतर मॅटर २५ न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे जाईल.

- उदय कुलकर्णी

प्रेरणा

चोर

प्रवचन संपलं.

गर्दी पांगली.

सगळे गेल्याची खात्री झाल्यावर कोपऱ्यात ओठंगून बसलेला एकजण स्वामीजींच्या समोर येऊन बसला आणि म्हणाला, मला दीक्षा द्याल का?

ते म्हणाले, का नाही? तुझी योग्यता वाटली तर दीक्षा देईनच. तो म्हणाला, तीच जरा भानगड आहे. मी तुमच्याआधी बऱ्याच साधुंकडे गेलो होतो. तेही असंच म्हणतात, पण, मी एक चोर आहे, हे कळल्यावर दीक्षा देत नाहीत. प्रवचनालाही येऊ नको म्हणतात. तुमचं बोलणं मला भारी वाटतं. तुम्ही जरा वेगळे वाटता. पण, माझ्यासारख्या चोराला तुम्ही दीक्षा द्याल का?

स्वामीजी म्हणाले, तू चोर आहेस, याच्याशी मला काय मतलब? माझ्या प्रवचनाला येणारे किंवा तू ज्यांना भेटलास त्या साधुंच्या प्रवचनाला येणारे सगळेजण साव असतात की काय? इथे तर साधुही चोर नसतील याचा भरवसा नाही. तर तुझ्या चोर असण्याचा दीक्षेशी संबंध काय? मिळेल तुला दीक्षा, पण एका अटीवर.

आलात तुम्ही लाइनवर, चोर निराशेने म्हणाल, आता तुम्ही सांगणार, दीक्षा देतो, पण चोरी सोड. ही आयडिया करणारे तुम्ही काही पहिले साधू नाही? मी चोर आहे. तो माझा पेशा आहे. मी चोरी करणारच. तुम्ही दीक्षा द्या किंवा देऊ नका.

अरे पण मी तुला चोरी सोड असं सांगणारच नाही, स्वामीजी हसून म्हणाले, किंबहुना मी काहीही सोड किंवा काहीतरी कर असं सांगणारा साधूच नाही. माझी एक साधीशी अट आहे. इथून पुढे आयुष्यात जे काही करशील ते साक्षीभाव जागृत ठेवून कर. आपण काय करतो आहोत, त्याचा पूर्ण विचार करूनच ते करायचं. एवढंच पथ्य पाळायचं.

ही अट चोराला सोपी वाटली.

तो आनंदाने दीक्षा घेऊन गेला.

काही दिवसांनी पुन्हा प्रवचन संपलं. गर्दी पांगली. पुन्हा चोर पुढे आला.

स्वामीजी म्हणाले, कसा आहेस?

वाट लावली राव तुम्ही माझी, चोर मान हलवून म्हणाला, तुमच्यापेक्षा ते आधीचे साधू परवडले. चोर म्हणून मला हाकलून तरी देत होते.

मी माझं काम करत होतो, सुखात होतो. तुम्ही मला स्वीकारून, दीक्षा देऊन मोठा लफडा केलात. का, काय झालं?

काय झालं काय विचारताय? माझं कामच बंद पाडलंत ना राव तुम्ही! आता मी चोरी करायला गेलो की पूर्ण साक्षीभावाने विचार करतो, तर माझ्याच्याने चोरी होतच नाही. परवा मी राजवाड्यात घुसलो होतो. हिरेमाणकांचे ढीग होते माझ्यापुढे. दोन मुठी भरून जरी घेतले असते, तरी सगळं लाइफ सेट झालं असतं. पण, तुम्हाला दिलेल्या वचनाप्रमाणे पूर्ण विचार केला तर मला ते दगडगोट्यांचे ढीग वाटायला लागले. हातच लाऊशी वाटेना त्यांना. आलो तसाच परत.

अर्रर्र, फार वाईट झालं. मग आता दीक्षा परत घेऊ म्हणतोस? तसं काही करायची गरजही नाही. माझ्याकडून तुझ्यावर कोणतंच बंधन नाही. तू हवं ते करायला मुक्त आहेस. मला दिलेलं वचन यापुढे पाळायची गरज नाही, बास. आता चोर हसायला लागला, गुरुदेव, मीही तुमचाच चेला बनलोय आता. तुमच्या बंधनातून तर मी चुटकीसरशी मुक्त होईन. तुम्ही हुशारीने मला माझ्याच बंधनात अडकवून टाकलंत, माझ्याच मनाशी ग्वाही बनवलंत, आता त्यापासून कसा मुक्त होणार? फुल गेम केलात राव माझा... फुल गेम!

ओशो

सिडको
शहरांचे शिल्पकार

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित

लवाद, नगररचना परियोजना क्र. ४, नैना, यांचे कार्यालय,
(आदई (भा.), आकुर्ली (भा.), नेवाळी (भा.), शिळोत्तर रायचूर (भा.) आणि पाली देवद (भा.))
(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र.१३ अन्वये)

जाहीर सूचना

शहर व औद्योगिक विकास महामंडळ, मर्यादित (सिडको) यांनी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून तयार केलेल्या व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८ (२) प्रमाणे मंजूर केलेल्या नैना प्रारूप नगर रचना परियोजना क्र.४ आदई (भा.), आकुर्ली (भा.), नेवाळी (भा.), शिळोत्तर रायचूर (भा.) आणि पाली देवद (भा.) चे लवादीय कामकाज कलम ७२ (४) प्रमाणे सुरु आहे. या संदर्भात महाराष्ट्र नगर रचना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(३) प्रमाणे विहित नमुना ४ मध्ये विशेष सूचना परीयोजनेतील प्रत्येक भूखंड धारकाला पाठविलेली आहे. परंतु अपुरे पत्ते किंवा अन्य कारणांमुळे उक्त विशेष सूचना काही भूखंड धारकांना मिळण्यामध्ये अडचण होऊ शकते. तरी ज्या भूखंडधारकांना अशी विशेष सूचना मिळालेली नसेल त्यांना हि जाहीर सूचना देण्यात येत आहे कि त्यांनी सुनावणी देणेसाठी व जाहीर सुचनेसोबत जोडलेल्या सुनावणीच्या वेळापत्रकानुसार नमूद केलेल्या दिनांकाला दिलेल्या वेळेत या वाद यांचे कार्यालयात ७/१२ चा उतारा व अन्य आवश्यक त्या कागदपत्रासह तसेच आधारकार्डासह उपस्थित राहावे. जे भूखंडधारक या दिनांकाला उपस्थित राहून सुनावणी देणार नाहीत त्यांना काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून उक्त परियोजना अंतिम स्वरूप देणेत येईल.

Sr. No.	Name of Owner	Survey No.	Hisaa No.	Village	OP No.	FP No.	First Schedule Date (MM/DD/YYYY)	First Schedule Time (HH:MM)
1	M/s J H V Construction Company Pvt Ltd tarfe Director Shri. Hiralal Jaiswal	27	27/0	Shilottar Raichur	65	114	15-May-23	09:30:00
2	Hiralal Jaiswal	25	25/0	Shilottar Raichur	63		15-May-23	09:30:00
3	Bhulan N Yadav Rajesh B Yadav Vivek Vinod Eknath Raghunath Bhopi	31	31/1	Shilottar Raichur	69		15-May-23	09:30:00
4	M/s J H V Construction Company Pvt Ltd tarfe Director Shri. Hiralal Jaiswal	21	21/0	Shilottar Raichur	59	117	15-May-23	09:30:00
5		22	22/0	Shilottar Raichur	60		15-May-23	09:30:00
6		20	20/0	Shilottar Raichur	58		15-May-23	09:30:00
7		24	24/0	Shilottar Raichur	62		15-May-23	09:30:00
8		26	26/0	Shilottar Raichur	64		15-May-23	09:30:00
9	Janardan Ladku Patil Balkrushna Ladku Patil Laxmi Ladku Patil	12	12/A/8	Shilottar Raichur	53A	120	15-May-23	10:00:00
10	Janardan Ladku Patil Balkrushna Ladku Patil Laxmi Ladku Patil	12	12/A/10	Shilottar Raichur	53C		15-May-23	10:00:00
11	Name as per 7/12	12	12/A/11	Shilottar Raichur	53D	244	15-May-23	10:00:00
12	Arvind Ramswaroop Anand Eknath Raghunath Bhopi	12	12/A/12	Shilottar Raichur	53E	118A	15-May-23	10:00:00
13	Name as per 7/12	12 (P)	12/A/13 (P)	Shilottar Raichur	53F	118B	15-May-23	10:00:00
14	Ramchandra Jayram Gharat	12	12/A/14	Shilottar Raichur	53G	118C	15-May-23	11:00:00
15	Name as per 7/12	12	12/A/15	Shilottar Raichur	53H	111	15-May-23	11:00:00
16	Pandharinath Changadev Thakur Meghnath Changadev Thakur Janabai Changadev Thakur	10	10/0	Shilottar Raichur	52	119	15-May-23	11:00:00
17	Parshuram Narayan Popeta, Tulsa Hendrya Patil, Ramesh Ganpat Bhagat Meghna Ramesh Thakur, Pandurang Dharma Dhavale, Baby Maruti Mhatre Nanda Rajan Patil, Shalu Ramdas Dhogde, Vatsala Hiraman Patil Sita Kanu Patil, Ramdas Dharma Dhavale, Harichandra Dharma Dhavale Suman Gurunath Shinde, Changi Trimbak Karambelkar, Ganesh Ganpat Bhagatnu Patil, Chahu Kanu Patil Gangubai Rama Mhatre, Sangita Hanuman Pawar, Radhabai Balkrushna Popeta, Jagdish Balkrushna Popeta Ranjana Prabhakar Bhoir, Kailash Maya Khandagale, Kavita Balkrushna Bhopi, Manisha Ashok Bhagat	17	17/0	Shilottar Raichur	55	124	15-May-23	11:00:00
18	Dnyneshwar Pundalik urf Kundalik Mhaskar Pandhrinath Pundalik urf Kundalik Mhaskar Tulshidas Pundalik urf Kundalik Mhaskar	46	46/D	Shilottar Raichur	129	127	15-May-23	12:00:00
19	M/s Konstar Builders and Developers Pv Ltd tarfe Managing Director Harban Sinh Bulan Navarottam Yadav	47	47/0	Shilottar Raichur	132	128	15-May-23	12:00:00
20	Om Shree Kartikey Garden Phase - 3 Co-op Housing Socitey Ltd	49	49/0	Shilottar Raichur	133	129	15-May-23	12:00:00
21	Suhail Mustak Khan	103	103/1	Akurli	299	130	15-May-23	12:00:00
22	Ajay Shivprasad Chaurasia Prashant Ramesh Chandra Agarwal	103	103/2	Akurli	300	131	15-May-23	02:00:00
23	Jagannath Krishna Dharnekar Gajanan Krishna Dharnekar Rajesh Dayaram Tathare Ashish Dayaram Tathare Jasmitsingh Jasbirsingh Gulati	104	104/1	Akurli	301	132	15-May-23	02:00:00
24	Dharma Govind Dharnekar	104	104/2	Akurli	302	133	15-May-23	02:00:00
25	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli Y. B. Paradkar Yogesh Dinanath Tre Avanti Ulhas Misal Nilima Dilip Mhatre Smita Kanchan Patil Bharti Dinanath Tre	102	102/2/105/24	Akurli	287	136	15-May-23	02:00:00
26	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli V. K. Singasane	102	102/2/105/23	Akurli	286	137	15-May-23	03:00:00
27	Ganesh Ramhari Gulbhile	102	102/2/105/22	Akurli	285	138	15-May-23	03:00:00
28	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli Madhusudhan Gopal Patil	102	102/2/105/13	Akurli	277	139	15-May-23	03:00:00
29	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli Vijay Kashinath Thakur	102	102/2/105/12	Akurli	276	140	15-May-23	03:00:00
30	M/s Gateway Ministries International tarfe trustee V J Joseph	102	102/2/105/15	Akurli	279	141	15-May-23	04:00:00
31	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli Gopal Balkrushna Pingulkar	102	102/2/105/16/17	Akurli	280	143	15-May-23	04:00:00
32	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli Gurunath Dattatrey Ghanekar	102	102/2/105/19	Akurli	282	144	15-May-23	04:00:00
33	Sarkari Naukar Sahkari Gruh Nirman Sanstha Kalamboli Madhukar V. Bhujbal	102	102/2/105/20	Akurli	283	145	15-May-23	04:00:00
34	Rajesh Vishnu Thakur Karan Dnyaneshwar Thakur Nama urf Namdev Bagaram Thakur Vijay Vishnu Thakur Karan Dnyaneshwar Thakur Rajesh Vishnu Thakur	28	28/0	Akurli	163	281	16-May-23	09:30:00
35	Harichandra Dhondu Bhopi Bharat Dhondu Bhopi	13	13/0	Akurli	147	282	16-May-23	09:30:00
36	Harichandra Dhondu Bhopi Bharat Dhondu Bhopi	132	132/0	Akurli	345	328A	16-May-23	10:00:00
37	Harichandra Dhondu Bhopi Bharat Dhondu Bhopi	164	164/0	Akurli	390		16-May-23	10:00:00
38	Harichandra Dhondu Bhopi Bharat Dhondu Bhopi	144	144/1/B	Akurli	362	328B	16-May-23	10:00:00
39	Harichandra Dhondu Bhopi Bharat Dhondu Bhopi	165	165/0	Akurli	391		16-May-23	10:00:00
40	Kanya Kumari Upasani Estate Sakori's Me.executor and trust Sati Upasani Maharaj Godavari Bai	29	29/0	Akurli	164	283	16-May-23	10:00:00
41	Balram Naga Bhopi	126	126/2/B	Akurli	338	285	16-May-23	10:00:00
42	Shardabai Gopal Bhopi for self & sr.no. 6 to 8 a.p.k. Manesh Gopal Bhopi Kailash Gopal Bhopi Bhushan Gopal Bhopi Ulhas Gopal Bhopi Ajay Gopal Bhopi Vijay Gopal Bhopi Sanjay Gopal Bhopi	26	26/2	Akurli	161	286	16-May-23	11:00:00
43	Sharada Gopal Bhopi	26	26/1	Akurli	160	287	16-May-23	11:00:00
44	Govind Shivram Bhopi	126	126/1	Akurli	336	289	16-May-23	11:00:00
45	Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote	34	34/1	Akurli	170	291	16-May-23	11:00:00
	Jaipal Ramanlal Balad Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint							
46	Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote Jaipal Ramanlal Balad Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint	34	34/2/1	Akurli	171		16-May-23	11:00:00
47	Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote Jaipal Ramanlal Balad	34	34/3/1	Akurli	173		16-May-23	11:00:00
48	Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote Jaipal Ramanlal Balad Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint	34	34/3/2	Akurli	174		16-May-23	11:00:00
49	Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote Jaipal Ramanlal Balad Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint	36	36/0	Akurli	176		16-May-23	11:00:00
50	Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote Jaipal Ramanlal Balad Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint	37	37/0	Akurli	177		16-May-23	11:00:00
51	Vilas Madanlal Kothari Prakash Gajanan Pote Jaipal Ramanlal Balad Sanjay Narayan Bhalerao Ramji Dharamshi Mint	40	40/3	Akurli	183		16-May-23	11:00:00
52	Prakash Gajanan Pote Prashant Srinivas Shevade Bhagwanji Dharamshi Patel Sanjay Narayan Bhalerao	73	73/1	Akurli	227		16-May-23	11:00:00
53	Sanjay Narayan Bhalerao Jaipal Ramanlal Balad Prakash Gajanan Pote Pratik Prakash Pote Bhagwanji Dharamshi Minat Anand Baburao Ambavle Vilas Mahadoo Wagmode Arun Shankar Gat	73	73/2	Akurli	228		16-May-23	11:00:00
54	Prakash Gajanan Pote Prashant Srinivas Shevade Bhagwanji Dharamshi Patel Sanjay Narayan Bhalerao	74	74/0	Akurli	229		16-May-23	11:00:00
55	Prakash Gajanan Pote Prashant Srinivas Shevade Bhagwanji Dharamshi Patel Sanjay Narayan Bhalerao	75	75/0	Akurli	230		16-May-23	11:00:00
56	Sanjay Narayan Bhalerao Jaipal Ramanlal Balad Prakash Gajanan Pote Bhagwanji Dharamshi Minat Anand Baburao Ambavle Vilas Mahadev Wagmode Arun Shankar Gat	76	76/1	Akurli	231		16-May-23	11:00:00
57	Jaipal Raman Lal Balad Prakash gajanan pote Sanjay Narayan Bhalerao Bhagwanji Dharamshi Minat Anand Baburao Ambawale Vilas Mahadev Waghamode Arun Shankar Gat	123	123/0	Akurli	333		16-May-23	11:00:00
58	Bino Joseph Kurien Jhajariya	122	122/0	Akurli	332	292	16-May-23	12:00:00
59	Vineet Gupta Suresh Agrawal	109	109/2	Akurli	311	297	16-May-23	12:00:00
60	Avinash Baburao Kumawat	110	110/1/A	Akurli	312		16-May-23	12:00:00
61	Vinit Gupta Suresh Agarwal	110	110/1/B	Akurli	313		16-May-23	12:00:00
62	Muktabai Sitaram Patil Yashwant Hiru Gavandi Ramesh Shivaram Khandagale	111	111/1/A	Akurli	316		16-May-23	12:00:00
63	Vinit Gupta Suresh Laxman Agarwal	112	112/0	Akurli	319		16-May-23	12:00:00
64	Mr. Monrov Griniska Partnered by Gopal Amar Thakur Ramnivas- Agarwal	113	113/0	Akurli	320		16-May-23	12:00:00
65	M/s Prathamesh Builders and Developers bhagidar Bhavana P. Singade Bharti Arvind Anand	46	46/5/1/A	Shilottar Raichur	124	298	16-May-23	12:00:00
66	Vignhharta Eklavya Sahakari Gruhnirman Sanstha	46	46/5/1/B (P)	Shilottar Raichur	125		16-May-23	12:00:00
67	Vignhharta Eklavya Sahakari Gruhnirman Sanstha	46	46/C	Shilottar Raichur	128		16-May-23	12:00:00
68	Ganga Realties LLP tarfe Director Janardan Mahadu Keni Pandurang Sakharam Keni Bhagatilal Motilal Dhakad Ramji Gela Bera Arvindkumar Motilal Dhakad (Jain) Kishor Kaluram Chaudhari Vignhharta Eklavya Sahakari Gruhnirman Sanstha (to be deleted from this sno.)	46	46/5/1/B	Shilottar Raichur	125	300	16-May-23	12:00:00
69	Raibai Sakharam Keni	46	46/B	Shilottar Raichur	127	301	16-May-23	02:00:00
70	Maharashtra Sarkar	45 (P)	45/1/3	Shilottar Raichur	89	302	16-May-23	02:00:00
71	Raghunath Tukaram Bhopi	159	159/2	Akurli	385	304A	16-May-23	02:00:00
72	Eknath Raghunath Bhopi	166	166/0	Akurli	392	304B	16-May-23	02:00:00
73	Vijaykumar Hemchand Jain Sajjankumar Nandkumar Gupta Narendra Hansraj Gupta	99	99/4/1	Akurli	257	305	16-May-23	03:00:00
74	Anusaya Balaram Bhopi Rupesh Balaram Bhopi	135	135/2	Akurli	349	306	16-May-23	03:00:00
75	Tikaram Viramji Chaudhari Yogesh Durgaram Chaudhari Sagar Kishr Chaudhari Santosh Shankar Asavale	117	117/2/B	Akurli	326	307	16-May-23	03:00:00
76	Tikaram Viramji Chaudhari Yogesh Durgaram Chaudhari Sagar Kishr Chaudhari Santosh Shankar Asavale	117	117/3	Akurli	327		16-May-23	03:00:00
77	Tikaram Viramji Chaudhari Yogesh Durgaram Chaudhari Sagar Kishr Chaudhari Santosh Shankar Asavale	135	135/1	Akurli	348		16-May-23	03:00:00
78	Tikaram Viramji Chaudhari Yogesh Durgaram Chaudhari Sagar Kishr Chaudhari Santosh Shankar Asavale	159	159/1/B	Akurli	384		16-May-23	03:00:00
79	Kanchan Ashish Agrawal Manoj Mahabir Agrawal	43	43/2/A	Adai	664		16-May-23	03:00:00
80	Manoj Mahabir Agrawal	45	45/9	Adai	685		16-May-23	03:00:00
81	Kishor Kaluram Chaudhari Tikaram Viramji Chaudhari Manoj Mahabir Agrawal	62 (P)	62/4	Adai	751		16-May-23	03:00:00
82	Tikaram Viramji Chaudhari Manoj Mahabir Agrawal Kishor Kaluram Chaudhari	81	81/2	Adai	873		16-May-23	03:00:00
83	Shayamsundar Krushnaji Kale	111	111/2	Akurli	318	308	16-May-23	03:00:00
84	Padu Rambhau Bhopi Anusaya Balram Bhopi Rupesh Balram Bhopi	111	111/1/B	Akurli	317	309	16-May-23	04:00:00

(पान ६ वर)

सिडको
शहरांचे शिल्पकार

Sr. No.	Name of Owner	Survey No.	Hisaa No.	Village	OP No.	FP No.	First Schedule Date (MM/DD/YYYY)	First Schedule Time (HH:MM)
85	Harichandra Dhondu Bhopi Bharat Dhondu Bhopi, Hirabai Parshuram Bhopi, Nitin Parshuram Bhopi, Sadhna Gurunath Thakur, Aarti Sandeep Patil, Saurabh Chandrakant Bhopi, Apak Aai Manisha Manjusha alias Manji Ambo Bhopi, Radhabai Parshuram Bhopi, Vanita Brahma Vaskar, Manisha Chandrakant Bhopi, Rohit Chandrakant Bhopi, Raghunath Ambo Bhopi	68	68/0	Akurli	220	**310**	16-May-23	04:00:00
86	Padmavati Vishwanath Bhagat	116	116/0	Akurli	323	**311**	16-May-23	04:00:00
87	Saddu Songya Mhatre Harishchandra Songya Mhatre Sunita Gurudev Pawar Parvati alias Barakubai Harishchandra Phadke Janabai Shripat Patil	115	115/0	Akurli	322	**313**	16-May-23	04:00:00
88	Saddu Songya Mhatre Harishchandra Songya Mhatre Sunita Gurudev Pawar	114	114/0	Akurli	321	**314**	17-May-23	09:30:00
89	Kavita Builder tarfe Pro. Pra. Ramesh k Jain	108	108/1	Akurli	308	**316**	17-May-23	09:30:00
90	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	86	86/1A	Adai	898		17-May-23	10:00:00
91	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	86	86/2	Adai	900		17-May-23	10:00:00
92	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	99	99/1	Adai	946		17-May-23	10:00:00
93	Mannapone Chako Sunny	230	230/1	Akurli	447		17-May-23	10:00:00
94	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	232	232/1	Akurli	450	**425**	17-May-23	10:00:00
95	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	232	232/2	Akurli	451		17-May-23	10:00:00
96	Mannapone Chako Sunny	236	236/0	Akurli	456		17-May-23	10:00:00
97	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	222	222/3	Akurli	437		17-May-23	10:00:00
98	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	224	224/1	Akurli	439		17-May-23	10:00:00
99	Bhupendra M Shah	45	45/8/A	Adai	683		17-May-23	10:00:00
100	Mannapone Chako Sunny	45	45/10	Adai	686		17-May-23	10:00:00
101	Mannapone Chako Sunny	46	46/0	Adai	688		17-May-23	10:00:00
102	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	47	47/1	Adai	689		17-May-23	10:00:00
103	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	48	48/0	Adai	699		17-May-23	10:00:00
104	Mannapone Chako Sunny	49	49/1	Adai	700		17-May-23	10:00:00
105	Mannapone Chako Sunny	49	49/4/B	Adai	704		17-May-23	10:00:00
106	Mannapone Chako Sunny	51	51/2/B	Adai	719		17-May-23	10:00:00
107	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	52 (P)	52/6	Adai	725		17-May-23	10:00:00
108	M C Sunny	52 (P)	52/10	Adai	728	**790**	17-May-23	10:00:00
109	Mannapone Chako Sunny	62	62/8	Adai	755		17-May-23	10:00:00
110	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	63	63/6	Adai	766		17-May-23	10:00:00
111	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	70	70/1	Adai	812		17-May-23	10:00:00
112	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	70	70/2	Adai	813		17-May-23	10:00:00
113	Bhupendra M. Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Director	73	73/10A	Adai	838		17-May-23	10:00:00
114	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	78	78/6	Adai	856		17-May-23	10:00:00
115	Manohar Ram Patil Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	114	114/2	Adai	1004		17-May-23	10:00:00
116	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	116	116/10	Adai	1018		17-May-23	10:00:00
117	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	116	116/4/3	Adai	1010		17-May-23	10:00:00
118	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	123	123/1	Adai	1097		17-May-23	10:00:00
119	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	134	134/2/3/1	Adai	1139		17-May-23	10:00:00
120	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	176	176/0	Akurli	401		17-May-23	10:00:00
121	Mannapone Chako Sunny	210	210/0	Akurli	416		17-May-23	10:00:00
122	Director of C. Queen Developers Pvt. Ltd., Bhupendra M. Shah, Mannapone Chako Sunny	18	18/8	Nevali	1244		17-May-23	10:00:00
123	Director of C. Queen Developers Pvt. Ltd., Bhupendra M. Shah, Mannapone Chako Sunny	18	18/12	Nevali	1248		17-May-23	10:00:00
124	Bhupendra M Shah	52 (P)	52/1	Adai	721		17-May-23	10:00:00
125	Director of C. Queen Developers Pvt. Ltd., Bhupendra M. Shah, Mannapone Chako Sunny	24	24/9	Nevali	1331		17-May-23	10:00:00
126	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	22	22/45	Nevali	1302		17-May-23	10:00:00
127	Laxman Pilaji Bhagat	86	86/6/3	Adai	906	**429**	17-May-23	10:00:00
128	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	81	81/3	Adai	874		17-May-23	10:00:00
129	Bhupendra M Shah	82	82/0	Adai	877		17-May-23	10:00:00
130	Mannopane Chako Sunny	83	83/15	Adai	891		17-May-23	10:00:00
131	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	86	86/6/1	Adai	904		17-May-23	10:00:00
132	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director	86	86/6/2	Adai	905		17-May-23	10:00:00
133	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	45	45/2	Akurli	191		17-May-23	10:00:00
134	Mannapone Chako Sunny	109	109/1	Akurli	310	**428A**	17-May-23	10:00:00
135	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	144	144/1/A	Akurli	361		17-May-23	10:00:00
136	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	200	200/1/A	Akurli	406		17-May-23	10:00:00
137	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	220	220/1/A	Akurli	431		17-May-23	10:00:00
138	Bhupendra M Shah Mannapone Chako Sunny M/s Sea Queen Developers tarfe Pvt. Ltd Director	222	222/2	Akurli	436		17-May-23	10:00:00
139	Mannapone Chako Sunny	224	224/2	Akurli	440		17-May-23	10:00:00
140	Bhupendra M Shah	50	50/1/B	Adai	706		17-May-23	10:00:00
141	Mannapone Chako Sunny	50	50/4	Adai	711		17-May-23	10:00:00
142	Bhupendra M Shah	50	50/7/D	Adai	715		17-May-23	10:00:00
143	Kavita Builder tarfe Pro. Pra. Ramesh k Jain	108	108/2	Akurli	309	**294**	17-May-23	10:00:00
489	Gopinath Trimbak Patil Vaman Trimbak Patil Ram Trimbak Patil Chandra Raghunath Phadke Baby Kanti Patil Vitthal Kanti Patil Sajna Kanti Patil Dashratha Trimbak Patil	135	135/1	Adai	1141		26-May-23	02:00:00
490	Roshan Ramesh Mhatre Sheetal Ramesh Mhatre Eknath Naga Shelke Madhuri Chandrakant Bhabal Parashuram Naga Shelke Janki Naga Shelke	123	123/6	Adai	1101	563	26-May-23	02:00:00
491	Gangabai Raghunath Bhoir	123	123/4	Adai	1100	564	26-May-23	02:00:00
492	Vijaybahadur Shivamurat Sharma	123	123/2/3/A	Adai	1098	565	26-May-23	03:00:00
493		123	123/2/3/B	Adai	1099		26-May-23	03:00:00
494		135	135/2	Adai	1142		26-May-23	03:00:00
495		137	137/4	Adai	1155		26-May-23	03:00:00
496		138	138/3	Adai	1160		26-May-23	03:00:00
497	Changu Budhaji Kakde Gomibai Balkrishna Patil Kurna Surendra Mhaiskar Arun Namdev Patil Roshan Ramesh Mhatre Sheetal Ramesh Mhatre Eknath Naga Shelke Madhuri Chandrkant Bhabal Parshuram Naga Shelke Janki Naga Shelke	139	139/2	Adai	1164	567	26-May-23	03:00:00
498	Anant Ganu Kakade	139	139/1	Adai	1163	568	26-May-23	03:00:00
499	Chandrakant Shankar Bhagwat	138	138/2	Adai	1159	571	26-May-23	03:00:00
500	Janardhan Ragho Patil	137	137/2/B	Adai	1153	572	26-May-23	04:00:00
501	Jagdish Pandurang Shelke Padmakar Pandurang Shelke Manohar Pandurang Shelke	137	137/1	Adai	1151	573	26-May-23	04:00:00
502	Dharmibai Chivana Shelke, Nanda Dhondu Sheke, Padibai Madhu Kakade, Pandhari alias Pandhinath Mahadev Shelke, Prakash Janu Shelke, Bammy Vitthal Shisave, Balaram Mahadev Shelke, Bandhu Bumblebee Shelke, Madan Chivana Shelke, Manisha Gurunath Bhagat, Mayura Vijay Patil, Mohan Chivana Shelke, Ramesh Shelke, Ram Dhondu Shelke, Rami Chivana Shelke, Lila Dhondu Shelke, Suman Dhondu Shelke, Sushila Balaram Bhoyar, Arun Mahadev Shelke, Kamlakar Janu Shelke, Kalavati Ganesh Paringe, Kunda Dhundu Shelke, Krishna Dhondu Shelke, Gulab Padu Kakade, Chandrabhaga Janu Shelke, Namdeo Kolhu Shelke	15	15/1/4/B	Adai	540	574	26-May-23	04:00:00
503		24	24/3	Adai	587		26-May-23	04:00:00
504		109	109/6	Adai	984		26-May-23	04:00:00
505		113	113/1/C/2	Adai	1001		26-May-23	04:00:00
506		133	133/2/B	Adai	1134		26-May-23	04:00:00
507		136	136/4/A/5/1	Adai	1148		26-May-23	04:00:00
508		136	136/4/B	Adai	1150		26-May-23	04:00:00
509	Krishna Ganpat Sutar	136	136/3	Adai	1147	575	26-May-23	04:00:00
510	Janardhan Kashinath Patil Harichandra Kashinath Patil Vikas Kashinath Patil	5	5/1	Adai	497	576	29-May-23	09:30:00
511	Bhupendra M Shah Mannopane Chako Sunny M/s Sea Queen Developers Pvt. Ltd. Tarfe Director Ananta Kundalik Shelke	134	134/1	Adai	1138	577	29-May-23	09:30:00
512	Buddhibai Bilya Bhopi Anil Bayla Bhopi Sunil balya Bhopi Gulab Krishna Bhagat Maibai Bandu Thakur Kamalabai Sitaram Bhopi Ganesh Sitaram Bhopi Mangesh Sitaram Bhopi	13	13/3/B	Adai	531	578A	29-May-23	10:00:00
513	Kamalabai Sitaram Bhopi Ganesh Sitaram Bhopi Mangesh Sitaram Bhopi Buddhibai Balya Bhopi Anil Balya Bhopi Sunal Balya Bhopi Gulab Krishna Bhagat Maibai Bandu Thakur	49	49/4/A	Adai	703		29-May-23	10:00:00
514	Kamalabai Sitaram Bhopi Ganesh Sitaram Bhopi Mangesh Sitaram Bhopi Buddhibai Balya Bhopi Anil Balya Bhopi Sunal Balya Bhopi Gulab Krishna Bhagat Maibai Bandu Thakur	116	116/7/B	Adai	1014		29-May-23	10:00:00
515	Kamalabai Sitaram Bhopi Ganesh Sitaram Bhopi Mangesh Sitaram Bhopi Buddhibai Balya Bhopi Anil Balya Bhopi Sunal Balya Bhopi Gulab Krishna Bhagat Maiai Bandu Thakur	133	133/1	Adai	1132	578B	29-May-23	10:00:00
516	Krishna Sudam Bhagat Devi Sudam Bhagat Ram Dumu Bhagat Banabai Shalik Bhagat Shivadas Shalik Bhagat Vimal Vasant Bhagat Sunil Vasant Bhagat Manda Shakil Bhagat Mahendra Tukaram Bhagat Umesh Tukaram Bhagat Vijay Tukaram Bhagat Santosh Tukaram Bhagat Ranjana Narayan Sahani Prajakta Jai Prakash Madhvi Sarita Bhanudas Bhagat Sachin Bhanudas Bhagat Samir Bhandas Bhagat A.P. K. Samir Bhanudas Bhagat	6	6/3	Adai	507		29-May-23	10:00:00
	Krishna Sudam Bhagat Devi Sudam Bhagat Ram Dumu Bhagat Banabai Shalik Bhagat Shivadas Shalik Bhagat Vimal Vasant Bhagat Sunil Vasant Bhagat Manda Shakil Bhagat Mahendra Tukaram Bhagat Umesh Tukaram Bhagat Vijay Tukaram Bhagat Santosh Tukaram Bhagat	6	6/5	Adai	508		29-May-23	10:00:00

सिडको
शहरांचे शिल्पकार

Sr. No.	Name of Owner	Survey No.	Hisaa No.	Village	OP No.	FP No.	First Schedule Date (MM/DD/YYYY)	First Schedule Time (HH:MM)
517	Ranjana Narayan Sahani Prajakta Jai Prakash Madhvi Sarita Bhanudas Bhagat Sachin Bhanudas Bhagat Samir Bhandas Bhagat A.P. K. Samir Bhanudas Bhagat					587		
518	Krishna Sudam Bhagat Devi Sudam Bhagat Ram Dumu Bhagat Banabai Shalik Bhagat Shivadas Shalik Bhagat Vimal Vasant Bhagat Sunil Vasant Bhagat Manda Shakil Bhagat Mahendra Tukaram Bhagat Umesh Tukaram Bhagat Vijay Tukaram Bhagat Santosh Tukaram Bhagat Ranjana Narayan Sahani Prajakta Jai Prakash Madhvi Sarita Bhanudas Bhagat Sachin Bhanudas Bhagat Samir Bhandas Bhagat A.P. K. Samir Bhanudas Bhagat	7	7/0.	Adai	512		29-May-23	10:00:00
519	Krishna Sudam Bhagat Devi Sudam Bhagat Ram Dumu Bhagat Banabai Shalik Bhagat Shivadas Shalik Bhagat Vimal Vasant Bhagat Sunil Vasant Bhagat Manda Shakil Bhagat Mahendra Tukaram Bhagat Umesh Tukaram Bhagat Vijay Tukaram Bhagat Santosh Tukaram Bhagat Ranjana Narayan Sahani Prajakta Jai Prakash Madhvi Sarita Bhanudas Bhagat Sachin Bhanudas Bhagat Samir Bhandas Bhagat A.P. K. Samir Bhanudas Bhagat	8	8/0.	Adai	513		29-May-23	10:00:00
520	Excel Reality Partnership Organization Sandeep Mohandas Makhija	40	40/5	Adai	651	589	29-May-23	10:00:00
521	Excel Reality Partnership Organization Sandeep Mohandas Makhija	42	42/1/C	Adai	658		29-May-23	10:00:00
522	Ram Kolhaya Kakade Madhukar Kolhaya Kakade Jija Kolhaya Kakade	9	9/1	Adai	514	590A	29-May-23	11:00:00
523	Ram Kolhaya Kakade Madhukar Kolhaya Kakade Jija Kolhaya Kakade	22	22/3	Adai	577		29-May-23	11:00:00
524	Bhavik Babubhai Ravaria Hitesh Babu Ravaria Babu Mohan Ravaria	45	45/1	Adai	676	590B	29-May-23	11:00:00
525	Dinesh Trilokchand Chaudhari	10	10/4	Adai	519	591	29-May-23	11:00:00
526	Dinesh Trilokchand Chaudhari	10	10/5/7/B	Adai	521		29-May-23	11:00:00
527	Dinesh Trilokchand Chaudhari	86	86/4	Adai	902		29-May-23	11:00:00
528	Dinesh Trilokchand Chaudhari Umadevi Dinesh Chaudhari Hemant Dinesh Chaudhari	110	110/2/5/C	Adai	988		29-May-23	11:00:00
529	Gajanan Kamalya Mhatre Radhabai Kamalya Mhatre Bandu Kamalya Mhatre Avinash Kamalya Mhatre Taiabai Balaram Patil Mai Ambo Kolkhekar Manjula Kamailya Mhatre Kamla Mukhshindra Shelke Kavita Rajesh Kharkar Gita Mahendra Roadpalkar Janaku Kanha Mhatre Deepali Vikram Dapolkar Vanita Baban Keni Sunita Rajesh Patil	10	10/3	Adai	518	592	29-May-23	11:00:00
530	Madhu Vijay Agarwal Vijay Narottamdas Agrawal	10	10/1	Adai	516	593	29-May-23	12:00:00
531	Madhu Vijay Agarwal Vijay Narottamdas Agrawal	10	10/2	Adai	517		29-May-23	12:00:00
532	Madhu Vijay Agarwal Vijay Narottamdas Agrawal	11	11/0.	Adai	#N/A		29-May-23	12:00:00
533	Madhu Vijay Agarwal Vijay Narottamdas Agrawal	12	12/2	Adai	525		29-May-23	12:00:00
534	Saraswati Namdev Panhale Kishore Namdev Panhale Santosh Namdev Panhale Manoj Namdev Panhale Vijaya Balkrishna Kirve Sulochana Vasantrao Karve Jayashree Subhash Khalde Ujjwala Vijay Khande Rajshree Chandrakant Deshmane	12	12/1	Adai	524	594	29-May-23	12:00:00
535	Saraswati Namdev Panhale Kishore Namdev Panhale Santosh Namdev Panhale Manoj Namdev Panhale Vijaya Balkrishna Kirve Sulochana Vasantrao Karve Jayashree Subhash Khalde Ujjwala Vijay Khande Rajshree Chandrakant Deshmane	12	12/3/A	Adai	526		29-May-23	12:00:00
536	Shantaram Kathor Shelke Kalpana Haribhau Shelke Jayashree Haribhau Shelke Rupesh Haribhau Shelke Sagar Haribhau Shelke	37	37/1/B	Adai	630	595	29-May-23	12:00:00
537	Muktabai Nilesh Kakade	62	62/6	Adai	753	596A	29-May-23	12:00:00
538	Muktabai Nilesh Kakade	63	63/25	Adai	776		29-May-23	12:00:00
539	Muktabai Nilesh Kakade	63	63/24	Adai	775	596B	29-May-23	02:00:00
540	Madhu Vijay Agarwal	12	12/3/B	Adai	527	597	29-May-23	02:00:00
541	Vijay Narottamdas Agarwal	13	13/3/A	Adai	530		29-May-23	02:00:00
542	Madhu Vijay Agarwal	15	15/1/4/A	Adai	539		29-May-23	02:00:00
543	Madhu Vijay Agarwal	15	15/2/A	Adai	545		29-May-23	02:00:00
544	Madhu Vijay Agarwal	15	15/8	Adai	551		29-May-23	02:00:00
545	Madhu Vijay Agarwal	15	15/9	Adai	552		29-May-23	02:00:00
546	Haresh ravji Majethia	16	16/4	Adai	556	599	29-May-23	02:00:00
547	Haresh ravji Majethia	44	44/1	Adai	670		29-May-23	02:00:00
548	Haresh ravji Majethia	45	45/11	Adai	687		29-May-23	02:00:00
549	Ganu Sudam Shelke Parashuram Sudam Shelke Bayabai Shantaram Shelke Gotiram Shantaram Shelke Raghunath Sudam Shelke Dattu Sudam Shelke Gurunath Shantaram Shelke Lalita Vasant Pavase	15	15/1/4/C	Adai	541	600	29-May-23	02:00:00
550	Jaiyendra Kana Mhatre	22	22/2	Adai	576	601	29-May-23	03:00:00
551	Ganu Mahadu Patil	13	13/2	Adai	529	604	29-May-23	03:00:00
552	Sudhakar Namdev Kakade Tukaram Namdev Kakade Ram Namdev Kakade Mukta Joma Mhatre Chhabi Rajaram Bhoyar Mukta Vaman Kakade Ganesh Vaman Kakade Sagar Vaman Kaka Rekha Uday Patil Mina Sandeep Ghodvinde	13	13/3/C	Adai	532	605	29-May-23	03:00:00
553	Sudhakar Namdev Kakade Tukaram Namdev Kakade Ram Namdev Kaka Mukta Joma Mhatre Chhabi Rajaram Bhoir Mukta Vaman Kakade Ganesh Vaman Kakade Sagar Vaman Kakade Rekha Uday Patil Mina Sandip Ghodvinde	15	15/3	Adai	547		29-May-23	03:00:00
554	Vijay Narottamdas Agarwal	117	117/6	Adai	1076	607	29-May-23	03:00:00
555	Vijay Narottamdas Agarwal	117	117/9/10/A	Adai	1077		29-May-23	03:00:00
556	Vijay Narottamdas Agarwal	117	117/10/B	Adai	1078		29-May-23	03:00:00
557	Savitribai Haribhau Amale	10	10/6/B	Adai	522	608	29-May-23	04:00:00
558	Nathuram Babaji Gayakar Shalu Nathuram Gayakar	5	5/6	Adai	502	609	29-May-23	04:00:00
559	Sunil M. Makhija Sandeep M Makhija	5	5/3	Adai	499	610	29-May-23	04:00:00
560	Sunil Mohandas Makhija Sandeep Mohandas Makhija	5	5/8	Adai	504		29-May-23	04:00:00
561	Excel Reality Partnership Organization Sandeep M Makhija	42	42/2/4	Adai	659		29-May-23	04:00:00
562	Draupadi Vishnu Shelke Pandit Vishnu Shelke Pradeep Vishnu Shelke	5	5/4/2	Adai	500	611	29-May-23	04:00:00
563	Draupadi Vishnu Shelke Pandit Vishnu Shelke Pradeep Vishnu Shelke	21	21/5	Adai	573		29-May-23	04:00:00
564	Draupadi Vishnu Shelke Pandit Vishnu Shelke Pradeep Vishnu Shelke	44	44/5	Adai	674		29-May-23	04:00:00
565	Draupadi Vishnu Shelke Pandit Vishnu Shelke Pradeep Vishnu Shelke	44	44/6	Adai	675		29-May-23	04:00:00

दिनांक: १०/०५/ २०२३

पत्ता : नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
आठवा मजला,बेलापूर रेल्वे स्टेशन,
सीबीडी बेलापूर– नवी मुंबई ४०० ६१४

(श्रीरंग दि. लांडगे)
लवाद,
नगर रचना परियोजना,नैना क्र. ४
(आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग),
शिळोत्तर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग))

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/०९१/२०२३–२४

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

कार्यालय : मु.वाशिवली, पो.पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड

जा.क्र.८६/२०२३ दिनांक : १२/०५/२०२३

ई-निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरीता ग्रामनिधीतून मौजे वाशिवली येथील राखीव गावठाणातील अतिक्रमण काढणेकरीता आवश्यक उपकरणे भाडे तत्त्वावर मागविणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १२/०५/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेली आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहीत मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

श्रीम.रक्ष्मी रविंद्र शिंदे — ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
श्रीम.गौरी महादेव गडगे — सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

कार्यालय : मु.वाशिवली, पो.पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड

जा.क्र.८७/२०२३ दिनांक : १२/०५/२०२३

३ री फेर ई-निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरीता १४ वा वित्त आयोगातून ग्रामपंचायत हद्दीतील रा.जि.प.शाळांना खेळाचे साहित्य पुरवठा करणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १२/०५/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेली आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहीत मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

श्रीम.रक्ष्मी रविंद्र शिंदे — ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
श्रीम.गौरी महादेव गडगे — सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

कार्यालय : मु.वाशिवली, पो.पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड

जा.क्र.८८/२०२३ दिनांक : १२/०५/२०२३

ई-निविदा सुचना

वडगांव ग्रुप ग्रामपंचायतीने सन २०२३/२४ सालाकरीता १५ वा वित्त आयोगातून ग्रामपंचायत हद्दीतील मागासवर्गीय महिलांना व्यवसाय फुड प्रशिक्षण देणे कामी शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १२/०५/२०२३ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध केलेली आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहीत मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

श्रीम.रक्ष्मी रविंद्र शिंदे — ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
श्रीम.गौरी महादेव गडगे — सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

दिन वार्ता

पंचांग
१३ मे २०२३ गुरूवार
विक्रम संवत्- २०७९
वैशाख शके संवत्- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- उत्तरायण
मास- वैशाख
ऋतु- वसंत
कृष्ण पक्ष
तिथि:अष्टमी ०६:५०:५७
तिथि:नवमी २८:४३:१५+
नक्षत्र:धनिष्ठा ११:३५:११
योग:ब्रह्म ०९:२२:३२
करण:कौलव ०६:५०:५७
करण:तैतिल १७:४५:५४
करण:गर २८:४३:१५+
सूर्य:मेष
चन्द्र:कुम्भ00:१८:१८
हिजरी सन् - १४४४
मुस्लिम मास - शव्वाल
तारीख - २२
विशेष
पारशी दबे मासारंभ
विठ्ठलानंद सरस्वती पुण्यतिथी - अमरावती
झिपरूअण्णा पुण्यतिथी - नसिराबाद (जळगाव)
शिवानंद केसरी महाराज पुण्यतिथी - औरंगाबाद

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते
१. कै. रुख्मिनी नामदेव पाटील
स्मरणार्थ, पेण

सुडोकू

			9	1	6		7	2
	1		5					9
	5		8			3		
9	6	8						3
3		5	1		9	4		6
4						7	9	5
		6			3		2	
5					1		3	
2	8		6	9	4			

शुक्रवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

3	9	1	6	4	5	8	2	7
7	8	5	3	1	2	6	4	9
6	2	4	7	9	8	1	3	5
2	6	9	5	7	3	4	8	1
1	5	7	8	2	4	9	6	3
8	4	3	1	6	9	7	5	2
9	7	2	4	3	6	5	1	8
5	1	6	2	8	7	3	9	4
4	3	8	9	5	1	2	7	6

शब्दकोडे क्र.१२२



आडवे शब्द : १. घुमा, न बोलणारा ४. युक्ती, चातुर्य ७. आपल्याकडे ओढणे ८. मत्स्य १०. स्तुती १२. वालुकामय जमीन १४. पराक्रम १५. एकाग्र चित्त, अवधान १७. पहाऱ्याचे काम १९. प्रत्येक वर्षी २१. परभारे २३. दारूचा एक प्रकार २४. अंत:करण २५. वाहून नेणारा २७. मिठी २८. वजनदार २९. संत्रे ३०. खरपूस पापुद्रा ३१. प्रजा ३३. किंमत ३४. तीव्र ऊन ३५. गाणे म्हणणारा ३८. देवाचे देहधारी रूप ४०. ऐट, दिमाख ४१. हिंदू धर्मानुसार प्रत्येकाने करायलाच हवे असे तीर्थाटन ४२. लावणीतील लावण्यवती ४३. अर्धपोटी परवड ४४. चोपडी ४५. शिळक, साठा ४६. हळू, संथ ४८. सर्वस्व ५१. 'मोती देणारा' समुद्रातील प्राणी ५२. बाण ५३. च्या साठी ५५. लोक ५६. पोलीस कोतवाल ५७. वरपांगी, दिखाऊ ६०. रंग ६१. सरस्वती, सारजा ६२. आदर ६३. पुष्परस ६४. पुणे-नागपूर मार्गावरील एक जंक्शन ६६. मलई ६७. सत्त्व ६८. काळतोंडे माकड ६९. हस्ते-परहस्ते, थांगपत्ता लागू न देता ७२. श्रीमंत ७४. निवांत, रेंगाळत- --- गमत ७६. होडी चालविणारा ७७. जमिनीकडून समुद्राकडे वाहणारे वारे ७८. च्या सह ७९. चिनीमातीची उथळ मोठी वाटी

उभे शब्द : १. शाळेचे प्रमुख शिक्षक २. खांब ३. चांगला ४. भक्कम, बळकट ५. खियांची छेड काढणारा ६. बूड ७. पादत्राण ८. आजी (संस्कृत) ९. सर्प ११. नवरदेव १३. नमस्कार १६. श्रेष्ठ पुरुष १८. श्रीविष्णूंचा बलीप्रतिपदेशी निगडीत अवतार २०. सामान्य २२. चांदी २४. सुसर २५. मोठी वाटी, कटोरा २६. वटवट, त्रास ३०. कोवळ्या दुधाचा पदार्थ ३२. एकूण एक, सर्व ३३. माणुसकी नसलेला, निष्ठूर ३६. सावकाशीने, फ ुरसतीने ३७. जनतेच्या मागणीनुसार ३९. आवेशाने पुढे जाणे ४३. पार्वतीचे एक नाव ४४. उलटी, ओकारी ४५. आपले राष्ट्रगीत ४७. ओशाळलेला ४९. टक, दृष्टी ५०. द्रव्य ५१. गायीची लेक ५४. रूसणाऱ्या विहिणबाई ५८. इंग्रजीत एक ५९. राग ६१. मांसमच्छी नसलेले जेवण ६३. स्नायू (इंग्रजी) ६५. मवाळ धोरण ६६. तपस्या ६८. चावट ६९. निवारक ७०. अंधार ७१. नूतन ७३. सेवक ७५. तटबंदी

शब्दकोडे क्र.१२१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.चलनवलन ४.जिवावर उदार होणे १०.कव ११.नवरंग १२.तळ १३.हिमालय १५.लवा १६.हजर १८.नवा १९.अगरबत्ती २१.समरस २४.तम २६.आम २७.नारद २८.सकाळ दुपार संध्याकाळ ३१.शीतकर ३३.कुल ३४.तन ३५.पात ३६.लत ३७.तलमसुती ३८.विनंती ३९.वाईट ४१.बाप ४२.चाकर ४४.लडिवाळ ४६.कर्जबाजारी ४८.चरस ४९.भला ५०.दादर ५२.गो ५३.सणवार ५५.शरम ५६.घनुष्यबाण ५७.डीन ५८.दारू ६१.कच ६३.वेताळसेना ६६.टीका ६७.मरगळणे ७१.रजत ७२.मनमुराद ७३.नीरस

उभे उत्तर : १.चकचकीत २.लव ३.वर्तमानकाळ भूतकाळ भविष्यकाळ ४.जिवलग ५.वारंवार ६.वग ७.उमज ८.रत ९.होळकर १४.लवा १६.हत्ती १७.रसरशीत १९.अमर २०.बरका २२.मदत २३.समोर २५.मसलत २६.आपादमस्तक २९.संतती ३०.ध्यान ३२.कसाई ३३.कुलशील ३५.पातीचा चहा ३८.विपरीत ३९.वारसदार ४०.टणत्कार ४१.बाजा ४३.कर ४५.डिब्बा ४७.बालवाडी ५१.दमदाटी ५३.सणक ५४.रवंचे ५४अ.टवाळ ५५.शबाना ५९.रुकावट ६०.समर ६२.चलन ६४.ताकद ६५.सेनानी ६८.रज ६९.गत ७०.कोस

www.krushival.in कृषीवल रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

बालांगण

चित्रे पाठविण्याचा पत्ता – कृषीवल कार्यालय, वेश्वी-अलिबाग.





फलाफक्त

तेंडल्या- एक ताजातवाना अनुभव

अलिकडे मराठी चित्रपटात भरपूर नवीन प्रयोग होत आहेत. तेंडल्या हा त्यातला एकदम ताजा मासला आहे. तरुण दिग्दर्शक आणि कलाकारांनी हा विष-य उत्तम फुलवला आहे. क्रिकेट आणि सचिन तेंडुलकरवरचं प्रेम आणि घरात मॅच पाहण्यासाठी स्वतःचा टीव्ही घेण्याची इच्छा बाळगणाऱ्या दोन तरुणांची कहाणी यात सांगितली आहे.

तेंडल्या'ची प्रेक्षणीय खेळी क्रिकेट आणि सचिन तेंडुलकर यांच्या लोकप्रियतेचा जनजीवनावरील गहिरा प्रभाव 'तेंडल्या'च्या कथानकाच्या पार्श्वभूमीला असला तरी मुळात ही गोष्ट आहे पॅशनची! आणि त्यामुळेच हा चित्रपट जितका नॉस्टॅल्जिक आहे, तितकाच आजचाही आहे, अगदी कोणाचाही आहे. एखादा खेळ किंवा खेळाडू यांच्याही पलीकडे जाऊन कोणत्याही क्षेत्राने त्रिकालबाधित मंतरले जाऊन एखादी पॅशन घेऊन त्यात जिगरबाज खेळी करणाऱ्या अगदी कोणाचाही आहे. होय, 'तेंडल्या' हा सिनेमा म्हणजे जाधवांच्या नादखुळा सचिनची पदार्पणीय दिग्दर्शकीय उत्तुंग कामगिरी आहे. सहदिग्दर्शक आणि संकलक नचिकेत वाईकर याची तोलामोलाची साथ आहे.

'तेंडल्या'च्या कथानकामध्ये दोन कथालेख समांतरपणे उलगडत जातात. एकात किशोरवयीन विक्रम ज्याचे टोपण नावच तेंडल्या तर दुसऱ्यात तरुण गज्या, अशा दोन मध्यवर्ती व्यक्तिरेखांची अनेक वळणं घेत उलगडत जाणारी आणि चरम सीमेला जाऊन पोचणारी धमाल नाट्यात्मक गोष्ट आहे. कथानकाचा तपशील मुद्दामच टाळतोय पण यात एक अतिशय संयतपणे उलगडणारी आल्हाददायक प्रेमकथाही आहे, आणि तरीही एकही

डॉ. अनमोल कोठाडिया

बाजारू गाणं यात नाही याचा दिलासा मात्र इथे देतोच. 'काय सांगायचंय?' हे नेमके कळल्यावर अनावश्यक मसाला घालण्याची गरज नसते, हे कळलेली ही 'पटकथाकार आणि दिग्दर्शक दवयी' (सचिन जाधव आणि नचिकेत वाईकर) आहे.

महत्वाचे म्हणजे 'तेंडल्या' पाहताना गोष्टीवरच फोकस राहतो, त्यावर किंवा सिनेमाच्या मूलभूत तंत्रावर तंत्रज्ञान कुठेही हावी होत नाही. त्यामुळे हा प्रामाणिक सिनेमा फिल्मी आखीवरेखीवपणातुन मुक्त राहतो. भांडवलमर्यादित तंत्रज्ञानसाधनांचा अपुरेपणाही जाणवत नाही, उलट मूलभूत तंत्राच्या दृष्टीने फिल्म अगदी सक्षमपणे बनलीय. अशी आशयावर हावी न होणारी सक्षम तंत्रज्ञ साथ छायाचित्रण (बालू सांडील्यासा), ध्वनी (गौरव वर्मा आणि पियुष शाह) आणि संकलन (नचिकेत वाईकर) या आणि इतर विभागांकडूनही लाभलीये.

यातील बहुतांश अप्रशिक्षित अव्यावसायिक अभिनय संचाचा केवळ सहज सुंदर वावरच नव्हे तर नाट्यात्मक क्षणांमधील अभिनयदेखील वाखाणण्याजोगा झालाय. फिरोज शेख (गज्या), अमन कांबळे (तेंडल्या), महेंद्र वाळुंज (राजा), विक्रम पाटील (पैलवान), राजू माळी (बंड्या) या साऱ्या मंडळींनी धमाल आणलीये तर अद्वैता जाधव (रंजी) या पोरीने तरल गोडवा आणलाय! कथानकातील सूक्ष्म तपशील आणि संवादात उतरलेली मातीतून उमललेली अस्सल बोलीभाषा यासाठी तर सचिन जाधवला मानलेच पाहिजे.

'तेंडल्या'चे कथानक ज्या नादखुळा पॅशनविषयी आहे, त्यातील व्यक्तिरेखांचा जसा खडतर, संघर्षमय प्रवास आहे, तसाच काहीसा प्रवास 'तेंडल्या' या सिनेमाच्या निर्मितीचाही आणि निर्माता म्हणून सचिन जाधवचा आहे. पण म्हणून त्या कणवेतून केवळ मी या सिनेमावर चांगले लिहीत नाहीये. त्या निर्मिती प्रवासावरही नंतर वेगळे कधीतरी लिहीनच, पण चित्रपट परीक्षण म्हणून येथे तो माझ्यासाठी चित्रपटबाह्य मुद्दा आहे. येथे मुद्दा एकच की हा एक अतिशय चांगला प्रामाणिक, व्यावसायिक मूल्य असलेला आणि कलात्मक उंची असलेला सिनेमा आहे. 'तेंडल्या'ची प्रेक्षणीय खेळी पाहायला रसिकप्रेक्षक चित्रपटगृहात पोचायलाच हवेत.

तेंडल्या' चित्रपटाच्या कथानकात स्वप्नांच्या मागे लागलेले हिरो हे फक्त कथानकापूरते मर्यादित नाहीयेत. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातदेखील हाच संघर्ष, हीच स्वप्नं, तोच पाठलाग आणि तेच यश... कथेचा मुख्य नायक असलेल्या फिरोजची ही कथा!

दिवसभर मोलमजुरी करून आल्यानंतर स्वयंपाकासाठी तीन दगडाच्या चुलीवर फुंकर मारण्याकरिता येणाऱ्या अडचणींना सामोरे जाणाऱ्या मुस्लिम समाजातील गवंडी व्यवसायात पारंगत असलेल्या घराण्यात फिरोजचा जन्म झाला आहे. वडील व्यवसायाने गवंडी. त्यांचा स्वभाव अत्यंत तापट, रागीट. फिरोज गमतीने त्यांना हिटलरचे सख्खे चुलत भाऊ असंही म्हणतो! ते म्हणतील तीच पूर्व दिशा. मनासारख्या गोष्टी झाल्या नाहीत तर चिडचीड करणारे, वेळप्रसंगी ते मारहाणही करायचे. गंवडी व्यवसाय, दिवसातून पाच वेळची नमाज, रमजान महिन्याचे सर्व रोझे यापलीकडे त्यांना जगाशी काही देणेघेणे नव्हते..!

फिरोजने इयत्ता चौथीत असताना पहिल्यांदा शाळेत स्नेहसंमेलनात भाग घेतला. त्यानंतर बारावीत जाईपर्यंत भीतीपोटी नंतर कधीही अशा कार्यक्रमात भाग घेता आला नाही. साहजिकच मनात सुरू असलेली घुसमट कागदावर उतरून त्याची कविता झाली. चारोळ्या, शायरी, कविता लिहिणारा फिरोज त्यातच अभिव्यक्तीचा आनंद शोधू लागला होता. दरम्यान दहावी-बारावीत शिकत असताना फिरोजने गवंडीकाम शिकावे यासाठी वडिलांनी शर्थीचे प्रयत्न केले, प्रसंगी दबाव आणला. पण त्यात रमेल तो 'कलावंत' फिरोज कसला? आयुष्यात असले काम करणार नाही हे त्याने मनाशी पक्के करून टाकले होते.२०१० ला त्याच्यातील कलाकाराला भान आले, ते 'नटरंग' या चित्रपटामुळे! कॉलेजमधल्या पारंपारिक दिनाला पुन्हा अभिनयाला प्रारंभ केला. राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यासपीठ उपलब्ध झाले. त्यातून थोडेफार नाव होऊ लागले. पुढे अंधश्रद्धा निर्मूलन समितीत गेला. तिथली पथनाट्ये त्याला साद घालत होती. त्याने तेही व्यासपीठ त्याच्यापरीने गाजवले. त्यामुळे तो आणखी चर्चेत आला आणि नेमकी हीच अडचण झाली. घरातल्यांना हे खटकू लागले. विरोध होऊ लागला. पण फिरोज खऱ्या अर्थाने अभिनयात 'घुसला' होता. त्यातून बाहेर पडणे त्याला मान्य नव्हते. घरातून होणाऱ्या विरोधाला सामोरे जाण्याचा प्रयत्न सुरूच होता. वडिल त्यांच्या भूमिकेवर ठाम होते, माघार घ्यायला तयार नव्हते. त्यामुळे नकळत बाप-लेकात दरी वाढली.

दरम्यानच्या काळात 'जोगवा' आणि 'रांझना' हे दोन चित्रपट फिरोजला ऊर्जा देणारे ठरले. आपणही कलेच्या क्षेत्रात काहीतरी केले पाहिजे ही उमेद वाढली. पण घरच्यांचा विरोध होताच. कॉलेजच्या एनएसएसच्या माध्यमातून राहुरी येथे फिरोजची 'आव्हान कॅम्प'साठी निवड झाली. त्यामध्ये सांस्कृतिक विभागातून फिरोजने नाटक बसवलं आणि या नाटकाला शिवाजी विद्यापीठात पहिल्या क्रमांकाचे बक्षीसही मिळालं. त्यानंतर फिरोज झपाटून गेला. कॉलेजचे युथ फेस्टिवल करत स्वतः काही स्क्रिप्ट लिहिण्यास सुरुवात केली. जवळच्या मित्राच्या मोबाईलवर व्हिडिओ शूट करत करत एक-दोन प्रोजेक्ट बाहेर काढले. हे सर्व होत असताना घरात मात्र विरोध सुरूच होता. वेळप्रसंगी घरी काहीतरी कारणे देऊन सांगली-कोल्हापूर-इचलकरंजी आणि पुणे या ठिकाणी जाऊन जिथे शूट सुरू असेल त्याठिकाणी जाऊन लोकांना हाता-पाया पडून 'मी फुकट काम करतो, पण संधी द्या!' अशा विनवण्या करू लागला. 'फिल्म मेकिंगबद्दल शिकायचं आहे आणि यामध्ये काम करायचं आहे' असं सांगू लागला. त्यावेळी अनेक जणांनी त्याला सांगितलं की या फिल्डमध्ये येण्यासाठी एकतर गॉडफादर आणि दुसरं म्हणजे गुड लुकिंग या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यापैकी फिरोजकडे काहीच नव्हतं; पण काम करण्याची इच्छा मात्र तीव्र होती. गुडलुकिंग नसल्यामुळे अभिनेता व्हायचं स्वप्न अपूर्ण राहिल की काय अशी भिती होती. पण त्याचे प्रयत्न सुरूच होते. फेसबुक असेल किंवा मेलद्वारे ज्या ठिकाणी शूट लागेल त्याठिकाणी जाऊन असिस्टंट डायरेक्शनचे काम शिकू लागला. ऑडिशनला जाण्यासाठी खर्च व्हायचा. तो मिळवण्यासाठी फिरोजने प्रसंगी वाळूचे ट्रक खाली केले. दरम्यान डिग्रीचे शिक्षण पूर्ण झाले. नंतर होमगार्डमध्ये भरती झाला. पदवीधर असूनही होमगार्डची नोकरी करत असल्याने पै-पाहुणे, नातेवाईकांच्या टीकेचे धनी व्हावे लागले. बैठा व्यवसाय काहीतरी असावा म्हणून फिरोजने टोनर प्रिंटरचे दुकान टाकले. टोनर प्रिंटरच्या व्यवसायाच्या सोबतीला जोडधंदा म्हणून एडिटिंगचं काम शिकू लागला. पुढे जाऊन एडिटिंगचे काम करत फोटोग्राफीच्या क्षेत्रात पाऊल टाकले. एकेदिवशी ड्युटीवर असताना अश्वमेध मोशन पिक्चर्समधून 'तेंडल्या'साठी त्याला कॉल आला. दोन मिनिटाच्या रोलसाठी निवड झाली. नंतर लीड क्टरसाठी त्यालाच निवडण्यात आले. दोन महिने कसून काम करावं लागलं. महिना-दीड महिना कामावरच न गेल्याने होमगार्ड ऑफिसने थेट त्याला राजीनामाच मागितला. एकीकडे कलेचे स्वप्न तर दुसरीकडे करिअरची चिंता असताना हातातला जॉब सोडून फिल्ममध्ये काम करणे थोडा धोकादायक वाटू लागले. घरचे पूर्ण नाराज असतानाही फिरोजने अभिनयाला प्राधान्य दिले. मिळालेल्या संधीचे सोनं करायचं हाच ध्यास ठेवून फिरोजने 'तेंडल्या'साठी जीवाचे रान केले आहे. अभिनयातील कमतरता दिग्दर्शक सचिन जाधव यांनी फिरोजकडून भरून काढल्या आहेत. तेंडल्यामध्ये लीड क्टर साकारणार आहे, हे घरी सांगितल्यावर तर वातावरण पारच बिघडलं. फिरोजच्या वडिलांनी बोलणंच टाकलं. आपल्या समाजात हे मान्य होणार नाही, याची त्यांना धास्ती होती. पण फिरोज पडला पुरोगामी. तो स्वतःच्या भूमिकेवर ठाम राहिला. आपणाला घरातून परवानगी मिळणार नाही याची खात्री होती. त्यामुळे धाडस एकवटून फिरोज 'तेंडल्या'मधल्या गज्या'च्या भूमिकेत शिरला. एका महिन्याचे शूटिंगचे नियोजन तब्बल दीड वर्षापर्यंत लांबलं. अनेक अडचणींचा सामना करत २०१८ मध्ये शूटिंग आणि डबिंगचं काम पूर्ण झालं. दिग्दर्शक सचिन जाधव चित्रपटाच्या यशाबद्दल आधीपासूनच खात्री बाळगून होता. आणि लगेचच एका वर्षात त्यांना त्याचं फळ देखील मिळालं. २०१९ च्या महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यामध्ये सर्वोत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्याचा पुरस्कार फिरोजला जाहीर झाला. रुळलेल्या वाटेवर सर्वजण चालत असतात... परंतु घर, समाज यांच्याविरोधात जाऊन एक वेगळी वाट निर्माण करू पाहणाऱ्या फिरोजसाठी हा पुरस्कार अत्यंत महत्त्वाचा होता. आपण घेतलेला निर्णय योग्यच होता, हे त्याने त्यातून सिद्ध करून दाखवले होते. त्यानंतर मात्र वडिलांची छाती अभिमानाने फुलली. पुरस्कार सोहळ्याला ते स्वतः हजर राहिले आणि मुलाचे तोंडभरून कौतुकही केले. फिल्म रिलीज होण्यासाठी खूप वाट पहावी लागली. का? ते सर्वांना माहीत आहे. त्यावर स्वतंत्रपणे लिहिता येईल आणि ते सगळेच काहींना नाटकीही वाटू शकते. मधला कोविड लॉकडाऊनचा काळ सगळ्यांसाठी अंधःकारमय होता तसाच तो फिरोजसाठीही होता. पण या काळात एक चांगली गोष्ट झाली, ती म्हणजे वडिलांना आपला मुलगा काय आहे ते जवळून पाहता आले. लोक कामे घेऊन घरी येतात, फिरोज लोकांची कामे कशी करतो, लोक किती विश्वास टाकतात आणि त्याने तो कसा संपादन केलाय हे त्यांनी जवळून अनुभवले. त्यांची नजर कमजोर होती. हळूहळू ती आणखी क्षीण होत गेली. शेवटच्या टप्प्यात तर त्यांना दिसायचे पूर्ण बंदच झाले होते. फिरोजच्या दुर्दैवाने रिलीज झालेली 'तेंडल्या' फिल्म त्यांना पाहता आली नाही. २०२१ ला त्यांचे निधन झाले. फिरोज या विषयावर आजही हळवा होतो. खरंतर माझ्या अभिनयाला त्यांनी विरोध केला, पण नंतर त्यांनी माझ्यावर तितकेच प्रेम केलं. माझं त्यांना थेटरमध्ये नेण्याचे स्वप्न अपूर्ण राहिलं... हे सांगताना त्याचा आवाज कातर होतो आणि त्याचे डोळे भरून येतात! सध्या राज्यात बहुतांश ठिकाणी हा सिनेमा रिलीज झालाय. जो तो फिरोजच्या अभिनयाची चर्चा करतो आहे. कधीकाळी जवळून जाताना दुर्लक्ष करणारे आता हुडकत येऊन त्याच्यासोबत फोटो काढत आहेत. या सर्व गर्दीत कुठेतरी नकळत फिरोज त्याच्या वडिलांना शोधत असतो... फिरोज ला आई आहे. गौसपाक नावाचा एक मोठा भाऊ आहे. रिहाना नावाची एक विवाहित बहीण आहे. ती विजापूर तालुक्यात इंडी गावात असते. तेंडल्या हा सिनेमा त्याच्यासाठी सर्व काही आहे, होता आणि राहील. त्याला एक नवी ओळख आणि उंची या सिनेमाने दिली आहे. यापुढच्या त्याच्या अभिनयाच्या कारकिर्दीसाठी खूप शुभेच्छा!

(सिनेमा गल्लीवरुन साभार)

कोण आहे हा फिरोज?

"तेंडल्या सिनेमातील गज्याचे काम करणाऱ्या फिरोज शेखची स्वतःची गोष्ट चित्रपटातल्या गज्यासारखीच आहे.. त्याविषयी

जंगलात वाघ पाहण्याची गोष्ट

"वाघ पाहणं हे थरारक असतं. जंगलातला वाघ पाहणं हे त्याहूनही थरारक असतं. पण या जंगल हे केवळ वाघांसाठी आणि सरकारी बाबूंच्या फायद्यासाठी असावं ही जाणीव मात्र त्रासदायक असते."

जंगलात पहिल्यांदा वाघ पाहिला की ती फ्रेम तुमच्या डोक्यात कायमची कैद होते असं एका मित्राकडून ऐकलं होतं. ताडोबाला पहिल्यांदा जाताना वाघ पाहण्याच्या उत्सुकतेबरोबर हेही डोक्यात होतं. पहिल्या सफारीत वाघाने दर्शन दिलं नाही; पण दुसऱ्या आणि तिसऱ्या सफारीत मात्र मनोकामना पूर्ण झाली. इतकी की पाहिली फ्रेम तर डोक्यात कैद झालीच, पण पुढच्याही बऱ्याच फ्रेम्स डोक्यात कैद झाल्या.

जंगल हा एक विलक्षण, थरारक असा अनुभव आहे यात शंकाच नाही. मला वाटतं की जंगल आपल्या अत्यंत मूलभूत जाणिवेच्या पातळीवर आपल्याशी कनेक्ट होतं. म्हणजे असं की आपण अवकाशात रॉकेट्स सोडली असली आणि एसी लावून बसत आलो तरी आपण सृष्टीचा भाग आहोत, 'सजीव प्राणी' आहोत ही जाणीव रसरसून वर यायची जागा म्हणजे जंगल. तिथली शांतता तर वर्णनाच्या पलीकडली. इथे काहीतरी 'गूढ' आहे असं जाणवत राहतं. वारा नसताना जे सततचं 'स्थिरचित्र' दिसत असतं ते एकाच वेळी स्वस्थ आणि अस्वस्थ करत राहतं. गुलजारची एक कविता आठवली. ती इथे देण्याचा मोह आवरत नाही -

दूर सुनसान-से साहिल के क़रीब
एक जवाँ पेड़ के पास
उम्र के दर्द लिए, वक़्त का मटियाला दोशाला ओढ़े
बूढ़ा-सा पाम का इक पेड़,
खड़ा है कब से
सैकड़ों सालों की तनहाई के बाद
झुक के कहता है जवाँ पेड़ से
'यार! गर्द सन्नाटा है, तन्हाई है...
कुछ बात करो!'

जंगलाविषयी लिहावं इतकं जंगल फिरणं झालेलं नाही. पण ताडोबा बघताना बरीच इंप्रेशन्स उमटतायत असं जाणवलं. ज्या दिवशी सकाळी वाघ दिसला आणि आमच्या जीपने त्याला वीस-पंचवीस मिनिटं जे फॉलो केलं तेव्हा तर इम्प्रेशन्सची मांदियाळी होती! सकाळी नवेगाव गेटवरून नेहमीप्रमाणे जीप निघाल्या होत्या. प्रत्येक जीप वाटा चोखाळत निघाली होती. आमच्या जीपला 'छोटा मटका' ऊर्फ 'सीएम' प्रथम दिसला. मटकासुर नामक वाघ आणि छोटी तारा नामक वाघीण यांचा हा मुलगा. ('छोटा मटका' असला तरी तो डल्ट वाघ आहे. त्याला आणि बबली नामक वाघिणीला तीन बछडे आहेत) वाटेवर उजव्या बाजूच्या झाडीतून पावलं टाकत येत होता. (दमदार पावलं हा शब्दप्रयोग आपण अनेकदा करतो. पण 'खरी दमदार पावलं ती ही' हे जंगलातल्या वाघाला बघून कळतं. शिवाय वाघासारखं काळीज, वाघाची छाती, वाघाची झेप, आम्ही वाघाच्या जबड्यात हात घालणारे आहोत वगैरे नेत्रदीपक भाषा वापरणारे, एसी एसयूव्हीमधून फिरणारे राज्यपातळीवरील आणि स्थानिक पातळीवरील नेते, युवानेते, संघटनाचालक आणि असंख्य गॉगलधारी कार्यकर्ते यांच्याबद्दल करुणा उत्पन्न व्हावी असं ते दर्शन असतं.) त्याने आमची अजिबात दखल घेतली नाही. अर्थात त्यात आश्चर्य नाही. अभयारण्यातले वाघ आपली दखल घेत नाहीतच; कारण त्यांना झाडांइतकीच जीपची सवय झालेली असते. तो पुढे येत राहिला आणि रिव्हर्स गिअर टाकून आमची जीप मागे जात राहिली. असं थोडा वेळ चाललं. एका वळणावर आम्ही एका वाटेला आणि तो दुसऱ्या वाटेला गेला. पण आम्ही अर्थातच त्याला आणखी फॉलो केलं. त्याला आणखी जवळून पाहिलं. मग एका टप्प्यावर येऊन थांबलो. तेव्हा बबली आणि तिचे बछडे दिसले. तोवर सगळ्या जीपना मेसेज गेले होतेच. मग दहा-पंधरा जीपमधली पन्नास एक माणसं, त्यांचे पन्नास एक कॅमेरे आणि पाच वाघांचं हे कुटुंब असा सीन झाला. तो यथावकाश संपला आणि जीप निघाल्या.

त्या दिवशी दुपारच्या सफारीत 'के २' हा एक सब-डल्ट वाघ दिसला. झूनाबाई नावाची वाघीण तिच्या दोन बछड्यांसह दिसली. एकूण दिवस सार्थकी लागला. ताडोबा भेटीनंतर दोनच दिवसात माझी वाघ पाहिल्यावर आलेली धुंदी उतरवली ती चंद्रपूरच्या विजय देठे या कार्यकर्त्यांनी. त्यामुळे इथून पुढे ताडोबा - भाग २ वाचायला तयार व्हा.

विजय देठे गडचिरोलीतील मेंढा लेखा गावच्या वन हक्क

उत्पल वबा

संघर्षात मोहन हिराबाई हिरालाल यांच्याबरोबर काम करत होते. मोहनभाऊंच्या वृक्षमित्र संस्थेतही ते होते. त्यांचं मुख्य योगदान होतं ते चंद्रपूरच्या गोंडपिंपरी तालुक्यातील पाचगाव या गावाला सामूहिक आणि वैयक्तिक वनहक्क मिळवून देण्यात. मिलिंद बोकील यांच्या 'कहाणी पाचगावची' या पुस्तकात विजयभाऊंबद्दल आपल्याला वाचायला मिळतं. पाचगावची कहाणी अवश्य वाचावी अशीच आहे. सध्या विजयभाऊ ताडोबा जंगलाच्या आसपासच्या परिसरातील गावांबरोबर काम करतायत. ताडोबाची गेट्सच २२ आहेत. या २२ गावांबरोबर इतर अनेक लहान गावं जंगलसीमेवर वसलेली आहेत. या गावांपैकी बहुसंख्य गावं आदिवासीबहुल आहेत. त्यांचे 'जल, जंगल, जमिनी'शी संबंधित प्रश्न हे विजयभाऊंचं कार्यक्षेत्र. त्यांनी अलीकडेच वकिलीची पदवीही घेतली आहे. 'एमएसडब्ल्यू' करून काम करायला लागल्यानंतर एका टप्प्यावर वकील असण्याचे फायदे लक्षात आल्यावर त्यांनी हा निर्णय घेतला.

एके काळी वनविभाग हा आदिवासींच्या आयुष्यातील प्रमुख खलनायक होता. त्यांच्या रोजच्या वावराच्या जंगलावर सरकारी नियंत्रण आल्यावर हे आदिवासी अचानक चोर आणि गुन्हेगार ठरू लागले. शिवाय त्यांच्यातील कुणीच विजय मल्ल्या किंवा अदानी नसल्याने त्यांना विनाचौकशी तुरुंगात टाकणं अर्थातच सोपं होतं. आदिवासी किंवा बिगर आदिवासी गावांमधील लोकांवर झालेल्या अत्याचारांची स्टोरी दीर्घकाळ कधीच चालत नाही. आपल्या विकासाची किंमत त्यांनी द्यायची आहे हे राज्यकर्ते आणि आपण, म्हणजे शहरी-निमशहरी जनता, यांनी ठरवूनच टाकल्याने तो प्रश्नच येत नाही. तर स्थानिक रहिवासी विरुद्ध वनविभाग या झगड्यात वनविभागाने (म्हणजे पर्यायाने सरकारने) आपली प्रतिमा सुधारण्यासाठी 'वाघ' हे कारण पुढे करून जंगलावरील आपली पकड अधिकाधिक आवळत नेली आहे असं विजयभाऊंचं म्हणणं. त्यांचा दुसरा मुद्दा असा की सगळं लक्ष वाघावर केंद्रित केल्याने इतर प्राण्यांवरचा फोकस जवळजवळ गेलाच आहे. वाघ हा अन्नसाखळीत सर्वात वर आहे. सर्वात खाली तृणभक्षी प्राणी आहेत. पण या दोघांच्या मधे कोल्हे, लांडगे, रानकुत्रे आहेत. ताडोबात आज हे औषधालाही शिल्लक नाहीत. (आम्हालाही गवे, रानडुक्कर, हरीण, नीलगाय, मोर आणि इतर अनेक पक्षी असे सगळे दिसले होते. पण एकही लांडगा, कोल्हा, रानकुत्रा दिसला नाही). तर हे सगळे गेले कुठे असा विजयभाऊंचा प्रश्न. वाघ हा मुद्दा पुढे करून आदिवासींना हटवत नेणं आणि मग तिथे मायनिंग सुरू करणं असा लाँग टर्म उद्देश आहे हा त्यांचा मुद्दा अगदीच निकालात काढण्याजोगा नाही. यात नकळतपणे सरकारच्या मदतीला येतो तो शहरातील वन्यजीवप्रेमी वर्ग. कारण या वर्गाला वाघाचं, जंगलाचं आकर्षण आहे. आम्ही वाघांसाठी इतकं करतो आणि हे गावकरी आमच्या कामात अडथळा आणतात असं प्रोजेक्ट करून या वर्गाची सहानुभूती मिळवण्याचा वनविभागाचा प्रयत्न असतो असं विजयभाऊ सांगतात.

छोटा मटका दिसल्यानंतर मनात जशी इम्प्रेशन्स उमटत होती तशीच विजयभाऊ घडाघडा बोलत असतानाही उमटत होती. अर्थात त्यात फार मोठा गुणात्मक फरक होता. वाघ बघतानाचं थ्रिल आणि आदिवासी-जंगल-वनविभाग-उर्वरित समाज ही चौकोनी कथा ऐकताना होणारं रियलायझेशन यात जाणिवेचं मोठं अंतर होतं. आपण एका कॉम्प्लेक्स जगात जगत असतो असं आपण म्हणतो; पण बहुधा हे जग इतकंही कॉम्प्लेक्स नसावं - आपण जर स्वसुखाच्या, 'स्व-थ्रिल'च्या मुळाशी जाऊ शकलो तर! त्याला चॅलेंज करू शकलो तर!

विजयभाऊंचा स्वतःचा वाघाचा अनुभवही दांडगा आहे. अभयारण्यातील वाघ आणि नैसर्गिक जंगलातील वाघ यांच्यातला त्यांनी सांगितलेला फरक ऐकल्यावर अभयारण्यातील वाघ हा माणसांनी 'बदलवलेला वाघ' आहे हे लक्षात येतं. आम्ही ताडोबाला गेलो होतो तेव्हा तिथे 'ताज' हॉटेल येऊ घातल्याचं कळलं. काही अंतरावर बांधकाम सुरू असल्याचं दिसत होतं. ताडोबातला वाघ बदलला तसा इथला परिसरही हळूहळू बदललाच असणार आहे. ताजमुळे तो आणखी बदलेल. या सगळ्याला सरसकट विरोध करावा, माझ्यासारख्या शहरी माणसांच्या वाघ बघण्याच्या ऊर्मींवर प्रश्न करावेत आणि त्यांना प्रचंड अपराधी वाटायला लावावं असं मला वाटत नाही - म्हणजे त्याबद्दल मला अजून स्पष्टता नाही. पण 'रियलाझेशन' नावाची एक गोष्ट असते यात शंका नाही. आणि ती होत नाही आहे हे मात्र सांगायला हवं. अलीकडे पालघरमध्ये आदिवासींवरील पोलीस कारवाईची बातमी अनेकांनी वाचली असेल. त्यात दोन वर्षाच्या लहान मुलाला कडेवर घेतलेल्या बाईलाही पोलिसांनी हाताला धरून घराबाहेर काढल्याचा उल्लेख होता. नागरिकांवर अशी पोलीस कारवाई डेक्कन जिमखाना, दादर, कोरेगाव पार्क, नरीमन पॉइंट किंवा नाशिक, नागपूरसारख्या प्रमुख शहरात होईल का? आणि चुकून झालीच तर केवढा गहजब होईल?

मला वाटतं मुद्दा ह्या रियलायझेशनचा आहे. 'ऑल आर इक्कल, बट सम लिव्ह इन द बिग सिटीज' हे जाणवण्याचा आहे. हे जाणवलं तर पुढचे प्रश्न पडू शकतील. त्यामुळे पुढच्या वेळी ताडोबाला आलो की जंगल सफारीपेक्षा विजय देठे यांच्याबरोबर फिरण्यात मला जास्त रस असेल. सीमेवरची माणसं जे सांगतील त्यातून बहुधा माझ्यातला सजीव आणखी सजीव होईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)